

आदिकवी

श्री वाल्मिकी

विरचित

मूळ संस्कृत


# रामायण

## ३

मराठी श्लोक

श्री. श्याम

कुलकर्णी



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# -श्रीवाल्मिकी रामायण-

## खंड ३

## मूळ संस्कृत व मराठी श्लोकमय अनुवाद-श्री.श्याम कुलकर्णी

# -श्रीवाल्मिकी रामायण – खंड ३

## मराठी समश्लोकी अनुवाद : श्री. श्याम कुलकर्णी

पत्ता : द्वाराश्री. जयवंत कुलकर्णी, ''गन्धार'' फ़्लॅटक्र. ५/४
आयडियल कॉलनी, कोथरूड पुणे४११०२९
संपर्क – व्हॉट्सऍपक्र. ९७६५४५६५८१
Email : sgk६६४२@gmail. com

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act १९५७ provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : ७ जानेवारी २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्री श्याम कुलकर्णी (काव्यानुवादक)



यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M. E. १९७५ अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त. लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित

# प्रास्ताविक

ग्रन्थ पूर्ण होण्यापूर्वीच प्रस्तावना लिहिणे हा मर्यादातिभङ्ग आहे आणि 24,000 श्लोकांच्या "वाल्मीकीय रामायण" या ग्रन्थातील 350-400 श्लोकांचे रूपान्तरण हे तर मूळ ग्रन्थाचा साठावा भाग पूर्ण करण्यासारखे आहे. त्यामुळे हे दोन शब्द केवळ ईसाहित्य चे श्री. सुनिळ सामन्त यांचे ऋण मान्य करण्यासाठी लिहीत आहे. केवळ त्यांच्या आग्रहामुळेच मी हे मोठे काम अंगावर घेतले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

या ग्रन्थास डॉ. रविन थत्ते यांच्यासारख्या महान व्यक्तीचा आशीर्वाद लाभणे हे माझे महद्भाग्य!

हे काम माझ्या हातून पूर्ण होण्याचे भाग्य मला लाभो येवढीच ईश्वरचरणी प्रार्थना !

श्याम कुलकर्णी



# Dr. Ravin Thatte

श्याम कुलकर्णी ह्यांची आणि माझी ओळख खरे तर माझ्या व्यवसायामुळे (प्लास्टिक सर्जन \ सुघटन शल्य) झाली होती ह्याची त्यांनी मला हल्लीच ह्या त्यांच्या प्रकल्पाबद्दल चर्चा करतांना करून दिली . पुढे मी ज्ञानेश्वरीवर लिहिण्यास सुरुवात केल्या नंतर देखील आमची भेट झाली होती हे मात्र आठवते. हा रामायणावरचा त्यांचा प्रयत्न \प्रकल्प बघून आणि वाचून मी थक्क झालो आहे . केवढे प्रचंड काम आहे हे! ह्या पूर्वी त्यांनी भगवत गीतेवर, रामरक्षेवर आणि मेघदूतावर अशीच समश्लोकी लिहिण्याची कामगिरी केली आहे हे कळल्यावर तर मी अवाक झालो . असला माणूस माझ्या परिचयाचा


आहे हे कळून धन्य वाटले. त्यांनी हे सगळे काम "मी स्वानंदासाठी करत आहे" असे लिहिले आहे . सगळ्या मोठ्या कृती ह्या स्वानंदातूनच निर्माण होतात हे फार जुने सत्य इथे परत उजळले आहे. ही हल्लीची समश्लोकी , रामायणाची, आताच वाचली. ती फार छान उतरली आहे आणि वाचतांना खिळवून ठेवते. प्रकल्प अजून पूर्ण व्हायचा आहे तो नक्कीच पूर्ण होईल अशी खात्री आहे आणि त्यासाठी माझ्या सारख्या अनेकांच्या शुभेच्छा पोहोचवण्याचे काम मी आनंदाने करतो आहे.

Dr. रविन थत्ते

**(प्लॅस्टिक सर्जन व संस्कृत पंडित. अध्यात्मावर ११ पुस्तके प्रकाशित)**

# श्रीवाल्मिकी रामायण- १ वा २ (सर्ग १ ते ३७) वाचण्यासाठी खालील मुखपृष्ठांवर क्लिक करावे



# - अथ श्रीवाल्मिकी रामायण- ३

# बालकाण्ड सर्ग 38

तां कथां कौशिको रामे निवेद्य मधुराक्षराम्।
पुनरेवापरं वाक्यं काकुत्स्थमिदमब्रवीत ॥1॥

कथा मधुर सांगून रामास विश्वामित्र ती।
प्रसंग दुसरा ऐसा त्यानंतर त्यास सांगती ॥1॥

अयोध्याधिपतिर्वीर पूर्वमासीन्नराधिपः।
सगरो नाम धर्मात्मा प्रजाकामः स चाप्रजः॥2॥

पूर्वी सगर नावाचा अयोध्यापति वीर जो ।
निपुत्रिक  तो धर्मात्मा पुत्रप्राप्तिस उत्सुक ॥2॥

वैदर्भदुहिता राम केशिनी नाम नामत:।
ज्येष्ठा सगरपत्नी सा धर्मिष्ठा सत्यवादिनी ॥3॥

कन्या विदर्भराजाची केशिनी नाव हे तिचे ।
ज्येष्ठ पत्नी सगराची धर्मिष्ठा सत्यवादिनी ॥3॥

अरिष्टनेमेर्दुहिता सुपर्णभगिनी तु सा ।
द्वितीया सगरस्यासीत पत्नी सुमतिसंज्ञिता ॥4॥

द्वितीय पत्नी सगराची सुमति या नामे असे ।
कन्या अरिष्टनेमीची भगिनी वैनतेयाचि ती ॥4॥

ताभ्यां सह महाराजः पत्नीभ्यां तप्तवांस्तपः।
हिमवन्तं समासाद्य भृगुप्रस्रवणे गिरौ ॥5॥

भार्यांसह दोन्ही जात महाराज हिमालयी ।
भृगुप्रस्रवण नामे शिखरी करती तप ॥5॥

अथ वर्षशते पूर्णे तपसाऽऽराधितो मुनिः।
सगराय वरं प्रादाद् भृगुः सत्यवतां वरः॥6॥

शत वर्षे पुरी होता तपे प्रसन्न होऊनी ।
वर देती सगरास सत्यवादी भृगु मुनी ॥6॥

अपत्यलाभ: सुमहान् भविष्यति तवानघ ।
कीर्तिं चाप्रतिमां लोके प्राप्स्यसे पुरुषर्षभ ॥7॥

अनेक पुत्र होतील निष्पापा हे नृपा तुज ।
कीर्ति अप्रतिम लोकी लाभेल जगती तुला ॥7॥

एका जनयिता तात पुत्रं वंशकरं तव ।
षष्टि पुत्रसहस्राणि अपरा जनयिष्यति ॥8॥

एका पत्नीस होईल पुत्र वाढवि वंश जो ।
साठ सहस्र पुत्रांची माता दुसरी होइल ॥8॥

भाषमाणं महात्मानं राजपुत्र्यौ प्रसाद्य तम् ।
ऊचतु: परमप्रीते कृतांजलिपुटे तदा ॥9॥

महात्मा बोलता ऐसे प्रसन्न करुनी तया ।
कर दोन्ही जोडुनिया अत्यानन्दे विचारती ॥9॥

एक कस्या:सुतो ब्रह्मन् का बहूञ्जनयिष्यति।
श्रोतुमिच्छावहे ब्रह्मन् सत्यमस्तु वचस्तव ॥10॥

ब्रह्मन् एक कोणास साठ सहस्र कुणास हे ।
जाणण्या इच्छितो आम्ही होवो वचन सत्य ते ॥10॥

तयोस्तद् वचनं श्रुत्वा भृगु: परमधार्मिक:।
उवाच परमां वाणी स्वच्छंदोऽत्र विधीयताम् ॥11॥
एको वंशकरो वास्तु बहवो वा महाबला:।
कीर्तिमन्तो महोत्साहा: का वा कं वरमिच्छति ॥12॥

ऐकुनी त्यांच्या वचना भृगु परमधार्मिक ।
म्हणे त्यांना राण्यांनो व्यक्त इच्छा तुम्ही करा ॥11॥

एक वंश चालवि जो की अनेक महाबली ।
उत्साही तसे कीर्तिमन्त कोणता वर पाहिजे॥1२॥

मुनेस्तु वचनं श्रुत्वा केशिनी रघुनन्दन।
पुत्रं वंशकरं राम जग्राह नृपसंनिधौ ॥13॥

मुनीचे वचन ऐकून केशिनी रघुनन्दना ।
मागे जो चालवी वंश पुत्र तो सगरास्तव॥13॥

षष्टिं पुत्रसहस्राणि सुपर्णभगिनी तदा ।
महोत्साहान् कीर्तिमतो जग्राह सुमति: सुतान् ॥14॥

भगिनी वैनतेयाची घेई साठ सहस्र जे ।
उत्साही यशस्वी ऐसे पुत्र सुमतीस लाभती ॥14॥

प्रदक्षिणमृषिं कृत्वा शिरसाभिप्रणम्य तम् ।
जगाम स्वपुरं राजा सभार्या रघुनन्दन ॥15॥

प्रद्‌क्षिणा घालुनि त्यां नमस्कारुनि मस्तके ।
भार्यांसह स्वपुरा जाई नृप तो रघुनन्दना ॥15॥

अथ काले गते तस्य ज्येष्ठा पुत्रं व्यजायत ।
असमञ्ज इति ख्यातं केशिनी सगरात्मजम् ॥16॥

जाता योग्य असा काल केशिनी ज्येष्ठ जी तिला।
सगराचा पुत्र होई असमञ्ज ख्यात होइ जो ॥16॥

सुमतिस्तु नरव्याघ्र गर्भतुम्बं व्यजायत।
षष्टि पुत्रसहस्राणि तुम्बभेदाद् विनि:सृता: ॥17॥

कनिष्ठा सुमतीस होई गर्भ तुम्बीएवढा।
त्यातून सहस्र साठ पुत्र जन्मति भेदता ॥17॥

घृतपूर्णेषु कुम्भेषु धात्र्यस्तान् समवर्धयन्।
कालेन महता सर्वे यौवनं प्रतिपेदिरे ॥18॥

घृतयुक्त कुम्भि ठेवोन दायागर्भांस रक्षिती ।
गेल्यावरी योग्य काळ सर्व यौवन युक्त ते ॥18॥

अथ दीर्घेण कालेन रूपयौवनशालिनः।
षष्टिःपुत्रसहस्राणि सगरस्याभवंस्तदा ॥19॥

दीर्घ काल असा जाता षष्टि सहस्र त्यातुनी
रूपयौवन शालीन सगरा पुत्र होति ते ॥19॥

स च ज्येष्ठो नरश्रेष्ठ सगरस्यात्मसम्भवः।
बालान्गृहीत्वा तु जले सरय्या रघुनन्दन ॥20॥

प्रक्षिप्य प्राहसन्नित्यम् मज्जतस्तान् निरीक्ष्य वै ।

सगराचा ज्येष्ठ पुत्र नगरातिल बालकां।
पकडुनी शरयूमध्ये टाकुनी त्यांची दशा ॥20॥
हसे पाहुनिया त्याना बुडताना असमञ्ज तो

एवं पापसमाचार: सज्जनप्रतिबाधक ॥21॥
पौराणामहिते युक्त: पित्रा निर्वासित: पुरात ।

असा पापाचार प्रवृत्त सज्जना पीडादायक ॥21॥
करी जनांच्या अहिता पिता नगरातुन घालवी ।

तस्य पुत्रोऽशुमान् नाम असमञ्जस्य वीर्यवान् ॥22॥
सम्मत: सर्वलोकस्य सर्वस्यापि प्रियंवद: ।

असमञ्जास असे पुत्र वीरश्रेष्ठअंशुमान ॥22॥
प्रिय जो सर्व लोकांस सर्वा मधुर बोलतो ।

तत: कालेन महता मति: समभिजायत ॥23॥
सगरस्य नरश्रेष्ठ यजेयमिति निश्चिता।

नंतर दीर्घकालान्ती सगराच्या मनि येतसे ।
नरश्रेष्ठा आता यज्ञ करण्या योग्य काळ हा ॥23॥

स कृत्वा निश्चयं राजा सोपाध्ययगणास्तदा ।
यज्ञकर्मणि वेदज्ञो यष्टुं समुपचक्रमे ॥24॥

करुनी निश्चय ऐसा वेदवेत्ता नरेश तो।
उपाध्याया समवेत तयारी यज्ञाची करी ॥24॥

**इति श्रीमद्रामायणे श्रीवाल्मीकीये अदिकाव्ये बालकाण्डाऽष्टात्रिंशः सर्गः ॥38॥**

# रामायण बालकांड सर्ग ३९

विश्वामित्रवच: श्रुत्वा कथांतें रघुनंदन:।
उवाच परमप्रीतो मुनिं दीप्तमिवानलं ।।१।।

विश्वामित्रे सांगितली कथा ऐकुनी राघव ।
प्रसन्न चित्ते अंती तेजस्वी मुनिंना वदे ।।१।।

श्रोतुमिच्छामि भद्रं ते विस्तरेण कथामिमाम् ।
पूर्वजो मे कथं ब्रह्मन् यज्ञं वै समुपाहरत ।।२।।

विस्तारे ऐकण्या ब्रह्मन असे उत्सुक मी  कथा  ।
मम  पूर्वज  सगरानी यज्ञ केला कसा तदा ।।२।।

तस्य तदवचनम् श्रुत्वा कौतूहल समन्वित: ।
विश्वामित्रस्तु काकुत्स्थमुवाच प्रहसन्निव ।।३।।

बोल ऐकुनिया त्याचे आनंदित  मुनि होउनी ।
हसुनी विश्वामित्र काकुत्स्था वदती असे ।।३।।

श्रूयतां विस्तरो राम सगरस्य महात्मन:।
शंकरश्वशुरो नाम्ना हिमवानिति विश्रुत: ।।४।।

विस्तारे ऐक हे रामा  सगराचे यज्ञवर्णन ।
हिमवान नाम प्रख्यात शिवश्वशुर होत ते  ॥४॥

विंध्यपर्वतमासाद्य  निरीक्षेते  परस्परं  ।
तयोर्मध्ये  समभवद् यज्ञ: स पुरुषोत्तम ॥५॥

विंध्यापर्यंत जाउनिया एकमेका न्याहाळती ।
मध्यस्थानी  पर्वतांच्या  यद्न्य आरंभतात ते ॥५॥

स हि देशो नरव्याघ्र प्रशस्तो यज्ञकर्मणि  ।
तस्याश्वचर्या काकुत्स्थ  दृढधन्वा महारथ:: ॥६॥

अंशुमानकरोत तात सगरस्य मते स्थित: ।

पुरुषसिंहां यज्ञास मानती देश योग्य तो ।
सगराच्या आज्ञेने यज्ञाश्वा रक्षण्या असे ।।६।।
महारथी अंशुमान जो धनुर्धर सुदृढ ।

तस्य पर्वणि तं यज्ञ यजमानस्य वासव: ।।७।।
राक्षसी तनुमास्थाय यज्ञियाश्वमपाहरत ।

परी पर्व दिनी इंद्र राक्षसरूपात येउनी ।।७।।
नेतसे चोरुनी अश्व यज्ञकार्या नियुक्त जे

ऱ्हियमाणे तु काकुत्स्थ तस्मिन्नश्वे महात्मन: ॥८॥
उपाध्यायगणा: सर्वे यजमानमथाब्रुवन्।

अपहरण अश्वांचे होत असता ऋत्विज ॥८॥
यजमानास पर्वाच्या दिनी म्हणती असे ।

अयं पर्वणि वेगेन यज्ञियाश्वोऽ पनीयते ॥९॥
हर्तारं जहि काकुत्स्थ हयश्चैवोपनीयतां ।
यज्ञच्छिद्रं भवत्येतत सर्वेषामशिवाय न:॥१०॥
तत् तथा क्रियतां राजं यज्ञोऽ च्छिद्र: कृतो भवेत

या पर्वात त्वरेने त्या अश्वा परत आणणे ॥९॥
चोरा पकडुनि मारून अश्वा परत आणवा ।
नातरी विघ्न यज्ञात सर्वां होत अमंगल ॥10॥
तेव्हां राजन् करा ज्याने निर्विघ्न यज्ञ होतसे॥

सोपाध्यावच: श्रुत्वा तस्मिन् सदसि पार्थिव:॥11॥
षष्टिं पुत्रसहस्राणि वाक्यमेतदुवाच ह ।
गतिं पुत्रा न पश्यामि रक्षसां पुरुषर्षभा:॥12॥
मन्त्रपूतैर्महाभागैरास्थितो हि महाक्रतु: ।

ऐकुनी वचना त्यांच्या यज्ञसभेतिल आपुल्या ॥11॥
साठ हजार पुत्रांना ऐसे सगर बोलती
संपादित असे यज्ञ पवित्र महात्म्यांनी जो॥12॥
शक्य हे मज ना वाटे बाधा राक्षस आणती

तद् गच्छथ विचिन्वध्वं पुत्रका भद्रमस्तु व: ॥13॥
समुद्रमालिनी सर्वा पृथिवीमनुगच्छथ ।
एकैकं योजनं पुत्रा विस्तारमभिगच्छथ ॥14।
यावत तुरगसंदर्शस्तावत खनत मेदिनीम ।

तमेव हयहर्तारं मार्गमाणा ममाज्ञया ॥15॥

तरी जाउनि पुत्रांनो शोध अश्वाचा करा ॥13॥
समुद्रावेष्टित पूर्ण पृथ्वीवरी फिरूमिया।
शोधा योजन योजन विस्तारे शोधण्यास्तव ॥14॥
अश्वाचा शोध ना लागे तोवरी खोदुनी पहा ।
लक्ष्य एकच राहू द्या अश्वचोरास शोधणे ॥15॥

दीक्षितः पौत्रसहितः सोपाध्यायगणस्त्वहम् ।
इह स्थास्यामि भद्रं वो यावत् तुरगदर्शनम् ॥16॥

यज्ञदीक्षित मी येथे पौत्रा उपाध्यायांसवे ।
राहतो मी इथे अश्व जोवरी सापडे दिसे ॥16॥

ते सर्वे हृष्टमनसो राजपुत्रा महाबला:।
जग्मुर्महीतलं राम पितुर्वचनयन्त्रिता: ॥17॥

आदेशे सर्व ते पुत्र पित्याच्या मनि हर्षुनी ।
रामा महीवरी सर्व शोधीत फिरु लागले ॥17॥

गत्वा तु पृथिवीं सर्वामदृष्ट्वा तं महाबला: ।
योजनायामविस्तारमेकैको धरणीतलम् ।

बिभिदुः पुरुषव्याघ्रा वज्रस्पर्शसमैर्भुजैः ॥18॥

शोध पृथ्वीतली सर्व महाबली घेति ते ।
अश्व न मिळाल्याने खोदण्यास आरंभती ।
स्वहस्ते वाटुनी भाग प्रत्येकी एक योजन ॥18॥

शूलैरशनिकल्पैश्च हलैश्चापि सुदारुणैः ।
भिद्यमाना वसुमती ननाद रघुनन्दन ॥19॥

योजिती खणण्यासाठी वज्रासम शूळ दारूण ।
नांगरहि तसे त्यानी आर्तनाद मही करे ॥19॥

नागानां वध्यमनानामसुराणां च राघव ।
राक्षसानां दुराधर्ष सत्त्वानां निनदोऽभवत ॥20॥

त्यांच्या मार्गात येणारे नाग राक्षस प्राणिही ।
मरता ते विव्हळती आर्तनादेच राघवा ॥20॥

योजनानां सहस्राणि षष्टिं तु रघुनन्दन ।
बिभिदुर्धरणी राम रसातलमनुत्तमम ॥21॥

खोदली योजने साठ सहस्र भूमी राघवा ।
जणू रसातल शोध सर्वोत्तम घेति ते ॥21॥

एवं पर्वतसंम्बाधं जम्बूद्वीपं नृपात्मजा:।
खनन्तो नृपशार्दूल सर्वत: परिचक्रमु: ॥22॥

नृपश्रेष्ठा अशी सर्व भूमी पर्वतयुक्त ती ।
खोदुनी राजकुमर शोधती सर्वत्र ते असे ॥22॥

ततो देवा: सगन्धर्वा: सासुरा: सहपन्नगा: ।
सम्भ्रान्तमनस: सर्वे पितामहमुपागमन ॥23॥

त्यामुळे भिउनी सर्व गन्धर्वासुर नाग ही ।
ब्रह्मदेवाकडे देव तसे सर्वचि धावती ॥23॥

ते प्रसाद्य महात्मानं विषण्णवदनास्तदा ।
ऊचु: परमसंत्रस्ता: पितामहमिदं वच: ।।24।।

विषण्ण वदनाने ते भय कंपित मानसे ।
प्रसन्न करण्या त्यांना बोलती वचना असे ।।24।।

भगवन्‌ पृथिवीं सर्वा खन्यते सगरात्मजै:।
बहवश्च महात्मानो वध्यन्ते जलचारिण: ।।25।।

भूमिला खणती सर्व सगरात्मज आणि ते।
जलचारी महात्म्यांचा जीवांचा वध होतसे ।।25।।

अयं यज्ञहरोऽस्माकमनेनाश्वोऽपनीयते ।
इति ते सर्वभूतानि हिंसन्ति सगरात्मजाः ॥26॥

याच्यामुळे विघ्न यज्ञी चोरुनी यज्ञ अश्वही
म्हणुनि सर्वभूतांना मारती सगरात्मज ॥26॥

**इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकिय आदिकाव्ये बालकाण्डे एकोनचत्वारिंशः सर्गः ॥39॥**

# बालकाण्ड सर्ग 40

देवतानां वच: श्रुत्वा भगवान् वै पितामह:।
प्रत्युवाच सुसंत्रस्तान् कृतान्तबलमोहितान् ॥1॥

सगरपुत्र बले त्रस्त देवांचे वच ऐकुनी ।
भगवान् ब्रह्मा त्यांना असे उत्तर देतसे ॥1॥

यस्येयं वसुधा कृत्स्ना वासुदेवस्य धीमत: ।
महिषी माधवस्यैषा स एव भगवान् प्रभु: ॥2॥

कापिलं रूपमास्थाय धारयत्यनिशं धराम्।
तस्य कोपाग्निना दग्धा भविष्यन्ति नृपात्मजा: ॥3॥

पृथ्वी ही असे सर्व वासुदेवाचि वस्तुही।
तशी पत्नी असे ती जी लक्ष्मीपती माधवाचिही ॥2॥
कपिलमुनीच्या रूपे धारती निरंतर धरा।
दग्ध कोपाग्निने त्यांच्या होतील सगरात्मज ॥3॥

पृथिव्याश्चापि निर्भेदो दृष्ट एव सनातन।
सगरस्य च पुत्राणां विनाशो दीर्घदर्शिनाम् ॥4॥

पृथ्वीचा असा नाश युगात आहे निश्चित ।
तसा सगरपुत्रांचा जाणती दूरदर्शि हे ॥4॥

पितामहवचः श्रुत्वा त्रयस्त्रिंशदरिंदमाः ।
देवा परमसंहृष्टाः पुनर्जग्मुर्यथागतम् ॥5॥

पितामह बोल ऐकून शत्रुघ्न देव तेहतिस । (तेहतीस कोटी)
ऐकुनी हर्षित होती जाती आले तसे पुन्हा ॥5॥

सगरस्य च पुत्राणाम् प्रादुरासीन्महास्वनः।
पृथिव्यां भिद्यमानायां निर्घातसमनिःस्वनः ॥6॥

खोदती पृथ्वी ते पुत्र सगराचे समयास त्या ।
प्रचंड ध्वनि निर्माण वज्रपातच हो जणु ॥6॥

ततो भित्त्वा महीं सर्वां कृत्वा चापि प्रदक्षिणम् ।
सहिताः सागराः सर्वे पितरं वाक्यमब्रुवन् ॥7॥

खणुनिया पृथ्वी सर्व करुनीही परिक्रमा ।
सगरात्मज येऊनी पित्यास वदती असे ॥7॥

परिक्रान्ता मही सर्वा सत्त्ववन्तश्च सूदिताः।
देवदानवरक्षांसि पिशाचोरगपन्नगाः ॥8॥

न च पश्यामहेऽश्वं ते अश्वहर्तारमेव च ।
किं करिष्याम भद्रं ते बुद्धिरत्र विचार्यताम् ॥9॥

फिरलो महीवरी सर्व देवता ,नाग ,राक्षसा ।
पिशाच दानव ऐशा प्राण्यां बलवान मारिले ॥8॥
तरिही न दिसे आम्हा अश्व वा अश्व चोरही ।
भले हो तुमचे सांगा आता काय करायचे ॥9॥

तेषां तद् वचनं श्रुत्वा पुत्राणां राजसत्तम:।
समन्युरब्रवीद् वाक्यं सगरो रघुनन्दन ॥10॥

ऐकुनी वचना त्यांच्या सगर श्रेष्ठ राज जो ।
होउनी कृद्ध त्यां बोले रघुनन्दन तेधवा ॥10॥

भूय: खनत भद्रं वो विभेद्य वसुधातलम् ।
अश्वहर्तारमासाद्य कृतार्थाश्च निवर्तत ॥11॥

जाउनी पुन्हा ते सर्व खोदुनी वसुधातल ।
शोधुनी अश्वचोरास घेउनी याच त्याजला ॥11॥

पितुर्वचनासाद्य सगरस्य महात्मन:।
षष्टि: पुत्रसहस्राणि रसातलमभिद्रवन् ॥12॥

महात्मा सगराचे हे पुत्र ऐकुनि बोल ते ।
आज्ञा मानुनि पुन्हा ते धरातळ खोदु लागले ॥12॥

खन्यमाने ततस्तस्मिन् ददृशु: परवतोपमम् ।
दिशागजं विरूपाक्षं धारयन्तं महीतलम् ॥13॥

खणताना दिसे त्याना पर्वताकार दिग्गज ।
विरुपाक्षा तया नाम धरा धारण तो करी ॥13॥

सपर्वतवनां कृत्स्नां पृथिवीं रघुनन्दन ।
धारयामास शिरसा विरूपाक्षो महागज: ॥14॥

वने पर्वत यासंगे पृथ्वीस रघुनन्दना ।
मस्तकी धारण करी विरुपाक्ष महागज ॥14॥

यदा पर्वणि काकुत्स्थ विश्रमार्थं महागज:
खेदाच्चलयते शीर्षं भूमिकम्पस्तदा भवेत ॥15॥

जेव्हां विश्रांति घेण्याला हलवी शिर आपुले ।
त्याच्या आघाते जणु भूकम्प होउ लागतो ॥15॥

ते तं प्रदक्षिणं कृत्वा दिशापालं महागजम् ।
मानयन्तो हि ते राम जग्मुर्भित्वा रसातलम् ॥16॥

श्रीरामा ते दिशापाला गजा घालुनि प्रदक्षिणा ।
करुनि सन्मान त्याचा भेदिती ते रसातळा ॥16॥

ततः पूर्वां दिशं भित्वा दक्षिणां बिभिदुः पुनः ।
दक्षिणस्यामपि दिशि ददृशुस्ते महागजम् ॥17॥

खणुनी दिशा ते पूर्व खणती दक्षिणेकडे ।
त्या दिशेसहि दिसे त्यांना महान तैसा गज ॥17॥

महापद्मं महात्मानं सुमहत्पर्वतोपमम् ।
शिरसा धारयन्तं गां विस्मयं जग्मुरुत्तमम् ॥18॥

तो महापद्म नावाचा गज विशालकायही ।
करी धारण पृथ्वीस स्तिमित पाहुनी होति ते ॥18॥

ते तं प्रदक्षिणं कृत्वा सगरस्य महात्मनः ।
षष्टि पुत्रसहस्राणि पश्चिमां बिभिदुर्दिशम् ॥19॥

प्रदक्षिणा घालुनि त्याला साठ सहस्र पुत्र ते ।
लागती भूमि खणाया पश्चिमेच्या दिशेकडे ॥19॥

पश्चिमायामपि दिशि महान्तमचलोपमम् ।
दिशागजं सौमनसं ददृशुस्ते महाबलाः ॥20॥

पश्चिमेच्या दिशेलाहि पर्वताकार महान गज ।
महाबली सगरपुत्रांना सौमनस नामे दिसे ॥20॥

ते तं प्रदक्षिणं कृत्वा पृष्ट्वा चापि निरामयम् ।
खनन्त: समुपक्रान्ता दिशं सोमवतीं तदा ॥21॥

परिक्रमा करुनी त्याची वास्तपुस्त करूनिया ।
सगरपुत्र भूमीस खणता जाती उत्तरे ॥21॥

उत्तरस्यां रघुश्रेष्ठ ददृशुर्हिमपाण्डुरम् ।
भद्रं भद्रेण वपुषा धारयन्तं महीमिमाम् ॥22॥

उत्तरेस रघुश्रेष्ठा पाहती हिमशुभ्र जो। (श्वेतभद्र)
कल्याणमय शरीरे तो धरेस करी धारण ॥22॥

समालभ्य ततः सर्वे कृत्वा चैनं प्रदक्षिणम्।
षष्टिः पुत्रसहस्राणि बिभिदुर्वसुधातलम् ॥23॥

कुशल पुसुनी त्याचे षष्ठिसहस्त्र पुत्र ते।
परिक्रमा करुनी त्याची खोदण्या लागती पुन्हा ॥23॥

ततः प्रागुत्तरां गत्वा सागराः प्रथितां दिशाम्।
रोषादभखनन् सर्वे पृथिवीं सगरात्मजाः ॥24॥

पूर्वोत्तर दिशेला ते जाउनी रोषपूर्वक ।
सगरपुत्र पृथ्वीला खणाया लागती पुन्हा ॥24॥

ते तु सर्वे महात्मानो भीमवेगा महाबला:।
ददृशु: कपिलं तत्र वासुदेवं सनातनम् ॥25॥

वेगाने खणती त्याना यावेळी जो सनातन ।
वासुदेवस्वरूपात कपिल भगवान दिसे ॥25॥

हयं च तस्य देवस्य चरन्तमविदूरत: ।
प्रहर्षमतुलं प्राप्ता: सर्वे ते रघुनन्दन ॥26॥

यज्ञअश्व चरताना दिसे त्याजवळी तयां ।
तया पाहुनिया रामा हर्ष सर्वांस होतसे ॥26॥

ते तं यज्ञहनं ज्ञात्वा क्रोधपर्याकुलेक्षणा: ।
खनित्रलांगलधरा नानावृक्षशिलाधरा: ॥27॥

यज्ञात विघ्न आणी हा मानुनी अति क्रोधित ।
कुदळ नांगर हातात तसे दगड वृक्षही ॥27॥

अभ्यधावन्त संकृद्धास्तिष्ठ तिष्ठति चाब्रुवन् ।
अस्माकं त्वं हि तुरगं यज्ञियं हतवानसि ॥28॥

दुर्मेधस्त्वं हि सम्प्राप्तान् विद्धि नः सगरात्मजान् ।

संतापे कृद्ध होऊनी धावुनी बोलती असे ।
हे दुर्बुद्धी आता ऊठ यज्ञाश्वा चोरिलेस तू ॥28॥
आता सावध आलेलो आम्ही सगरपुत्र रे ।

श्रुत्वा तद्वचनं तेषां कपिलो रघुनन्दन ॥29॥
रोषेण महताविष्टो हुंकारमकरोत् तदा ।

ऐकुनी त्यांच्या वचना कपिल अतिक्रोधित ॥29॥
मुखातुनि क्रोधे त्याच्या हुंकार अतिकर्कश ।

ततस्तेनाप्रमेयेण कपिलेन महात्मना।
भस्मराशीकृता: सर्वे काकुत्स्थ सगरात्मजा: ॥30॥

प्रभावशाली हुंकारे महात्मा कपिलाचिया ।
जाळुनी सगरपुत्रांना राख करुनी टाकले ॥30॥

**इति श्रीमद्रामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डे चत्वारिंश: सर्ग: ॥40॥**

# रामायण बालकाण्ड सर्ग 41

पुत्रांश्चिरगतान् ज्ञात्वा सगरो रघुनन्दन ।
नप्तारमब्रवीद् राजा दीप्यमानं स्वतेजसा ॥1॥

पुत्राना जाउनी काळ लोटला बहु जाणुनी ।
अंशुमान् पौत्र तेजस्वी सगर त्या बोलला असे ॥1॥

शूरश्च कृतविद्यश्च पूर्वेस्तुल्योऽसि तेजसा ।
पितृणां गतिमान्विच्छ येन चाश्वोऽपवाहित: ॥2॥

पूर्वजासम तेजस्वी शूर विद्वान वत्स तू ।
अनुसरुनि थोरांना अश्वचोरास शोध तू ॥2॥

अन्तर्भौमानि सत्त्वानि वीर्यवन्ति महान्ति च ।
तेषां तु प्रतिघातार्थ सासिं गृण्हीश्व कार्मुकम् ॥3॥

बलवान् पृथ्वीवरी जीव लढण्यासी तयांसवे ।
खड्गासह धनुष्या तू जा घेऊनि तुझ्यासवे ॥3॥

अभिवाद्यभिवाद्यांस्त्वं हत्वा विघ्नकरानपि।
सिद्धार्थ: संनिवर्तस्व मम यज्ञस्य पारग ॥4॥

वन्दुनी वन्दनीयाना मारुनी विघ्नकारकां ।
करी मनोरथ सफल यज्ञ पूर्ण करी मम ॥4॥

एवमुक्तोऽशुमान् सम्यक् सगरेण महात्मना ।
धनुरादाय खड्गं च जगाम लघुविक्रमः ॥5॥

सगर महात्मा ऐसे बोलता अंशुमान तो ।
धनुष्य खड्ग घेवोनी निघे शीघ्र पराक्रमी ॥5॥

स खातं पितृभिर्मार्गमन्तभोमं महात्मभिः।
रापद्यत नरश्रेष्ठ तेन राज्ञाभिचोदितः ॥6॥

काकांनी थोर त्याच्या जो मार्ग बनविला असे ।
नरश्रेष्ठा त्यावरी तो सगरप्रेरित जातसे ॥6॥

देवदानवरक्षोभि: पिशाचपतगोरगै:।
पूज्यमानं महातेजा दिशागजमपश्यत ॥7॥

दिग्गजा पाहि तो ज्याला पूजती देव दानव ।
पिशाच्च,राक्षस पक्षी नागही त्याबरोबरी ॥7॥

स तं प्रदक्षिणं कृत्वा पृष्ट्वा चैव निरामयम् ।
पितॄन् स परिपप्रच्छ वाजिहर्तारमेव च ॥8॥

प्रदक्षिणा घालुनि त्याला काकांविषयी विचारित ।
तसाच अश्वचोराचा ठिकाणाही विचारि तो ॥8॥

दिशागजस्तु तच्छ्रुत्वा प्रत्युवाच महामति:।
आसमंज कृतार्थस्त्वं सहाश्व: शीघ्रमेष्यसि ॥9॥

म्हणे दिग्गज ऐकूनी कुमारा असमंज हे ।
येशील घेउनी अश्वा झडकरी तू निश्चित ॥9॥

तस्य तद्वचनं श्रुत्वा सर्वानेय दिशागजान ।
यथाक्रमं यथान्यायं प्रष्टुं समुपचक्रमे ॥10॥

ऐकुनी वचना त्याच्या अंशुमान विचारित ।
दिग्गजां सर्व न्यायोक्त प्रश्नांस क्रमश: तसे ॥10॥

तैश्च सर्वैर्दिशापालैर्वाक्यज्ञैर्वाक्यकोविदैः ।
पूजित: सहयश्चैवागन्तासीत्यभिचोदित: ॥11॥

वाक्यकोविद दिशापाल सत्कारोनिया तया ।
शुभ चिन्तति घोड्यास निश्चित घेउनी येशील ॥11॥

तेषां तद्वचनं श्रुत्वा जगाम लघुविक्रम:।
भस्मराशीकृता यत्र पितरस्तस्य सागरा: ॥12॥

ऐकुनी आशीर्वचना अंशुमान शीघ्र जातसे ।
स्थानी त्या जाइ पडलेले सागर भस्म होउनि ॥12॥

स दु:खवशमापन्नस्त्वसमंजसुतस्तदा ।
चुक्रोश परमार्तस्तु वधात तेषां सुदु:खित: ॥13॥

वधाने दु:खित त्यांच्या अंशुमान असमंज तो ।
आर्तभावे करी शोक रुदनास करोनिया ॥13॥

यज्ञियं च हयं तत्र चरन्तमविदूरत: ।
ददर्श पुरुषव्याघ्रो दु:खशोकसमन्वित: ॥14॥

दु:खी पुरुषव्याघ्राला चरताना दिसे तिथे ।
यज्ञाचा अश्व तेथेच अंशुमान पाहतो तया ॥14॥

स तेषां राजपुत्राणाम् कर्तुकामो जलक्रियाम् ।
स जलार्थो महातेजा न चापश्यज्जलाशयम् ॥15॥

जलांजलि देण्या त्यांना महातेजस्वि अंशुमान ।
पाही जलाशय तेथे परी न दिसतो तया ॥15॥

विसार्य निपुणां दृष्टिं ततोऽपश्यत खगाधिपम् ।
पितॄणां मातुलं राम सुपर्णमनिलोपमम् ॥16॥

दृष्टीने दूर पाही तो वैनतेय दिसे तया ।
वेगवान मातुल जो काकांचा त्याच्या असे॥16॥

स चैनमब्रवीद्वाक्यं वैनतेयो महाबल: ।
मा शुच: पुरुषव्याघ्र वधोऽयं लोकसम्मत: ॥17॥

वैनतेय महाबली अंशुमनास म्हणे असे ।
विचार न करी याचा लोकसम्मत हा वध ॥17॥

कपिलेनाप्रमेयेण दग्धा हीमे महाबल ।
सलिलं नार्हसि प्राज्ञ दातुमेषां हि लौकिक्म ॥18॥

महात्मा कपिलांनी या दग्ध केले महाबलां।
लौकिक जले अंजली देणे नसे उचित त्यां ॥18॥

गंगा हिमवतो ज्येष्ठा दुहिता पुरुषर्षभ।
तस्यां कुरु महाबाहो पितॄणां सलिलक्रियाम् ॥19॥

हिमवान् कन्या ज्येष्ठ गंगाच पुरुषोत्तमा।
तिच्या जलाने करणे त्यांना तर्पण योग्य हे ॥१९॥

भस्मराशीकृतानेतान् प्लावयेल्लोकपावनी।
तया क्लिन्नमिदं भस्म गंगया लोककान्तया।

षष्टिं पुत्रसहस्राणि स्वर्गलोकं गमिष्यति ॥20॥

भस्मराशी झालेल्यांना गंगा जी लोकपावनी ।
आप्लावित करे जेव्हां भस्म हे जले तिच्या ।
तेव्हां स्वर्गलोकास जातील सगळेच ते ॥20॥

निर्गच्छाश्वं महाभाग संगृह्य पुरुषर्षभ ।
यज्ञं पैतामहं वीर निवर्तयितुमर्हसि ॥21॥

यज्ञअश्वास घेऊनी पुरुषश्रेष्ठा नीघ तू ।
पितामहांच्या यज्ञाची जाऊन करि पूर्ति तू ॥21॥

सुपर्णवचनं श्रुत्वा सोंऽशुमानतिवीर्यवान् ।
त्वरितं हयमादाय पुनरायान्महातपा: ॥22॥

ऐकुनी वचना त्याच्या अंशुमान महारथी ।
अश्वास घेउनी जात पुन्हा स्वस्थानि वीर तो ॥22॥

ततो राजानमासाद्य दीक्षितं रघुनन्दन ।
न्यवेदयत यथावृत्तं सुपर्णवचनं तथा ॥23॥

यज्ञात दीक्षित राजा त्यापाशी जाउनी वदे ।
वृतान्त सगळा तैसे वदे काय सुपर्णही ॥23॥

तत्छृत्वा घोरसंकाशं वाक्यमंशुमतो नृपः ।
यज्ञं निवर्तयामास यथाकल्पं यथाविधि ॥24॥

भयंकर वृत्त ऐकून अंशुमान वदे तसे ।
नियमानुसार कल्पोक्त यज्ञ विधिवत तो करी ॥24॥

स्वपुरं त्वगमच्छ्रीमानिष्टयज्ञो महीपतिः ।
गंगायाश्चागमे राजा निश्चयं नाध्यगच्छत ॥25॥

यज्ञानंतर परतूनी राजा राजधानीप्रती ।
गंगेस आणण्यासाठी त्याचा निश्चय होइ ना ॥25॥

अगत्वा निश्चयं राजा कालेन महता महान्।
त्रिंशद्वर्षसहस्राणि राज्यं कृत्वा दिवं गत: ॥26॥

विचार करुनी त्याचा उपाय न सुचे तया।
तीस हजार वर्षे तो करुनी राज्य स्वर्गि जातसे ॥26॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये एकचत्वारिंश: सर्ग: ॥41॥**

# रामायण बालकाण्ड सर्ग 42

# गङ्गावतरण

कालधर्मं गते राम सगरे प्रकृतीजना: ।
राजानं रोचयामासुरंशुमन्तुं सुधार्मिकं ॥1॥

सगराच्या नंतर रामा अंशुमाना प्रजाजन ।
पसंत करती राज्य करण्या धर्मात्म्यास त्या ॥1॥

स राजा सुमहानासीदंशुमान रघुनन्दन ।
तस्य पुत्रो महानासीद् दिलीप इति विश्रुत: ॥2॥

अंशुमान् बने राजा प्रतापी पुत्र त्या महान् ।
नामे दिलीप तो ख्यात महान रघुनन्दना ॥2॥

तस्मै राज्यं समादिश्य दिलीपे रघुनन्दन ।
हिमवच्छिखरे रम्ये तपस्तेते सुदारुणम् ॥3॥

दिलिपा राज्य देऊन अंशुमान हिमालयी ।
शिखरी रम्य जाऊनी कठोर तपस्या करी ॥3॥

द्वत्रिंशच्छतसाहस्रं वर्षाणि सुमहायशा: ।
तपोवनगतो राजा स्वर्गं लेभे तपोधन ॥4॥

बत्तीस सहस्र वर्षे करुनी तप अंशुमान ।
तपोधने संपन्न तो स्वर्गप्राप्त करीतसे ॥4॥

दिलीपस्तु महातेजा: श्रुत्वा पैतामहं वधम् ।
दु:खोपहतया बुद्ध्या निश्चयं नाध्यगच्छत ॥5॥

पितामहांचे आपुल्या जाणुनी वृत्त दु:खि तो ।
करुनी विचार तोही निश्चया करु ना शके ॥5॥

कथं गंगावतरणं कथं तेषां जलक्रिया ।
तारकेयं कथं चैतानिति चिन्तापरोऽभवत ॥6॥

धरेवर गंगा कैसी अवतरणे सम्भव ।
उद्धारा पितरा देणे जले जलांजलि तिच्या ॥6॥

तस्य चिन्तयतो नित्यं धर्मेण विदितात्मन: ।
पुत्रो भगीरथो नाम जज्ञे परमधार्मिक: ॥7॥

सदा चिन्तित या राजा दिलीपा पुत्र धार्मिक ।
भगीरथ नावाचा तोही अत्यंत धार्मिक ॥7॥

दिलीपस्तु महातेजा यज्ञैर्बहुभिरिष्टवान् ।
त्रिंशद्वर्षसहस्राणि राजा राज्यमकारयत ॥8॥

अनुष्ठाता बहु यज्ञांचा महातेजस्वी दिलीप।
तीस सहस्र वर्षे तो राज्य पृथ्वीवर करी ॥8॥

अगत्वा निश्चयं राजा तेषामुद्धरणं प्रति ।
व्याधिना नरशार्दूल कालधर्ममुपेयिवान् ॥9॥

पितरां उद्धरण्याचा घेता न निर्णय नृप ।
व्याधीपीडित होऊनी मृत्युलोकास जातसे ॥9॥

इन्द्रलोके गतो राजा स्यार्जितेनैव कर्मणा ।
राज्ये भगीरथं पुत्रमभिषिच्य नरर्षभ ॥10॥

पुण्यकर्मे इन्द्रलोकास राजा दिलीप जातसे ।
राज्यपदि बैसवोनी पुत्रा आपुल्या भगीरथा ॥10॥

भगीरथस्तु राजर्षिर्धार्मिको रघुनन्दन ।
अनपत्यो महाराज: प्रजाकाम: स च प्रजा: ॥11॥
मन्त्रिष्वाधाय तद् राज्यं गंगावतरणे रत:।
तपो दीर्घ समातिष्ठद् गोकर्णे रघुनन्दन ॥12॥

भगीरथ धर्मशील राजर्षी रघुनन्दना ।
अपत्य नसे त्याला असे इच्छा परी प्रजा ।

आणि राज्याचाहि भार मन्त्रिगणावर सोपवी ॥11॥
पृथ्वीवरती गंगा आणाया यत्नशील तो ।
त्यासाठी तपस्या घोर गोकर्ण तीर्थी करी ॥12॥

ऊर्ध्वबाहु: पंचतपा मासाहारो जितेन्द्रिय: ।
तस्य वर्षसहस्राणि घोरे तपसि तिष्ठत: ॥13॥
अतीतानि महाबाहो तस्य राज्ञो महात्मन: ।

वर धरुनी भुजां दोन्ही महिन्यातुन एकदा ।
करी सेवन पंचाग्नि आणि राही जितेन्द्रिय ॥13॥
सहस्र वर्षे करी ऐसे तप घोर भगीरथ ।

सुप्रीतो भगवान् ब्रह्मा प्रजानां प्रभुरीश्वर:॥14॥
तत: सुरगणै: सार्धमुपागम्य पितामह: ।
भगीरथं महात्मानं तप्यमानमथाब्रवीत ॥15॥

प्रजास्वामी तदा ब्रह्मा प्रसन्न बहु त्यावरी ॥14॥
देवासहित तो येई महात्मा भगीरथाकडे ।
आणि तप करणाऱ्या त्याला असे म्हणतसे ॥15॥

भगीरथ महाराज प्रीतस्तेऽहं जनाधिप: ।
तपसा च सुतप्तेन वरं वरय सुव्रत ॥16॥

भगीरथा महाराजा उग्र तपस्येने तुझ्या ।
प्रसन्न अति मी माग वरा जे तुजला हवे ॥16॥

तमुवाच महातेजा: सर्वलोकपितामहम् ।
भगीरथो महानाहु: कृतांजलिपुट: स्थित: ॥17॥

भगीरथ हात जोडोनी उभा राहुनि त्यांपुढे ।
करीतसे मागणे तो सर्वलोकपितामहा ॥17॥

यदि मे भगवान् प्रीतो यद्यस्ति तपस: फलम् ।
सगरस्यात्मजा: सर्वे मत्त: सलिलमाप्नुयु: ॥18॥

आपण प्रसन्न असला फल उत्तम द्यावया ।
गंगाजल तपस्येने सगरपुत्रां प्राप्त हो ॥18॥

गंगाया: सलिलक्लिन्ने भस्मन्येषां महात्मनाम् ।
स्वर्गं गच्छेयुरत्यन्तं सर्वे च प्रपितामह: ॥19॥

गंगाजले भस्मराशी सिंचने प्रपितामहां ।
सर्व माझ्या मिळो स्वर्ग अक्षय हेचि मागणे ॥19॥

देव याचे ह संतत्यै नावसीदेत् कुलं च न: ।
इक्ष्वाकूणां कुले देव एष मेऽस्तु वर: पर: ॥20॥

याचतो मी संततीही इक्ष्वाकुकुल चालण्या ।
संपूर्ण कुलास लाभो वर उत्तम जो मला ॥20॥

उक्तवाक्यं तु राजानं सर्वलोकपितामहः।
प्रत्युवाच शुभां वाणीं मधुरां मधुराक्षराम् ॥21॥

भगीरथ असे वदता ब्रह्मा लोकपितामह ।
उच्चारती मधुरा वाणी शब्दा मधुर यापरी ॥21॥

मनोरथो महानेव भगीरथ महारथ ।
एवं भवतु भद्रं ते इक्ष्वाकुकुलवर्धन ॥22॥

कल्याण तुझे होवो इक्ष्वाकुकुलनंदना ।
मनोरथ पूर्ण या रूपे व्हावे आशीर्वच मम ॥22॥

इयं हैमवती ज्येष्ठा गंगा हिमवत: सुता: ।
तां वै धारयितुं राजन् हरस्तत्र नियुज्यताम् ॥23॥

हिमालय ज्येष्ठ कन्या करण्या धारण तिला ।
अनुकूल करी राजा महादेवास त्यास्तव ॥23॥

गंगाया: पतनं राजन् पृथिवी न सहिष्यते ।
तां वै धारयितुं राजन् नान्यं पश्यामि शूलिन: ॥24॥

गंगेचा वेग पतनाचा पृथ्वी नच साहू शके ।
शंकराविण ना अन्य तिज धारण करू शके ॥24॥

तमेवमुक्त्वा राजानं गंगां चाभाष्य लोककृत ।
जगाम त्रिदिवं देवऐः सर्वैः सह मरुद्गणैः ॥25॥

राजास म्हणुनी ऐसे गंगेसहि आज्ञापुनी ।
देवता मरुद्गणांसह स्वर्गलोकास जाति ते ॥25॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे द्विचत्वारिंशः सर्गः ॥42॥**

# श्रीरामायण बालकाण्ड सर्ग 43

देवदेवे गते तस्मिन् सोऽङ्गुष्ठाग्रनिपीडिताम्।
कृत्वा वसुमतीं राम वत्सरं समुपासत ॥1॥

जाता ब्रह्मा निघोनिया एकाच अंगुष्ठावरी।
उभा राहूनी तपस्या शिवाची भगीरथ करी ॥1॥

अथ संवत्सरे पूर्ण सर्वलोकनमस्कृत:।
उमापति: पशुपती राजानमिदमब्रवीत ॥2॥

वर्ष होता पूर्ण शिव उमापति प्रकट ते ।
ते सर्वलोकवन्दित राजास वदती असे ॥2॥

प्रीतस्तेऽहं नरश्रेष्ठ करिष्यामि तव प्रियम् ।
शिरसा धारयिष्यामि शैलराजसुतामहम् ॥3॥

प्रसन्न मी तुजवरती तुला प्रिय करीन मी ।
हिमालयकन्येस करी धारण मी शिरी ॥3॥

ततो हैमवती ज्येष्ठा सर्वलोकनमस्कृता ।
तदा सातिमहद्रूपं कृत्वा वेगं च दु:सहम् ॥4॥

आकाशादपतद् राम शिवे शिवशिरस्युत ।
हिमकन्या सर्वलोक जिला वन्दति ती तदा

शिवाला अनुसरुनि त्याच्या दिव्य मस्तकी ॥4॥
धारुनीया महद्रूप वेगाने दु:सह पडे ।

अचिन्तयच्च सा देवी गंगा परमदुर्धरा ॥5॥
विशाम्यहं हि पातालं स्रोतसा गृह्य शंकरम् ।

गंगादेवी मनी चिन्ती प्रवाहे प्रखर आपुल्या ॥5॥
शंकरास घेऊनिया पाताळात घुसेन मी ।

तस्यावलेपनं ज्ञात्वा कृद्धस्तु भगवान् हरः ।
तिरोभावयितुं बुद्धिं चक्रे त्रिनयनस्तदा ।

जाणुनि विचार तिचा त्रिनेत्रधारी क्रुद्ध तो ।
होउनी तिज अदृष्य करण्याचे आणी मनी ॥6॥

सा तस्मिन् पतिता पुण्या पुण्ये रुद्रस्य मूर्धनि ॥7॥
हिमवत्प्रतिमे राम जटामण्डलगह्वरे ।
सा कथंचिन्महीं गन्तुं नाशक्नोद् यत्मनास्थिता ॥8॥

गंगा ती पुण्यरूप रुद्राच्या पवित्र शिरी ॥7॥

गुहाच जटामण्डल सुशोभित हिमालयी ।
शिरुनी पृथ्वीवरी ती प्रयत्ने न पडू शके ॥8॥

नैव सा निर्गमं लेभे जटामण्डलमन्ततः ।
तत्रैवाबभ्रमद् देवी संवत्सरगणान् बहून् ॥9॥

जटाजाली फसे आणि बाहेर न पडू शके ।
अनेक वर्षे तैसी जटेत अडकूनिया ॥9॥

तामपश्यत् पुनस्तत्र तपः परममास्थितः ।
स तेन तोषितश्चासीदत्यंत रघुनन्दन ॥10॥

पाहुनिया गंगेस जटेतच अडकली ।
भगीरथ तपा पुन्हा करुनी तोषवी शिवा ॥10॥

विससर्ज ततो गंगां हरो बिन्दुसर: प्रति ।
तस्यां विसृज्यमानानां सप्त स्रोतांसि जज्ञिरे ॥11॥

शिव नि:सारि गंगेस बिन्दुसरोवरि तिच्या ।
तेथुनी सात धारात रामा ती वाहु लागली ॥11॥

हलादिनी पावनी चैव नलिनीं च तथैव च ।
तिस्र प्राची दिशं जग्मुर्गंगा: शिवजला: शुभा: ॥12॥

ल्हादिनी पावनी नलिनी तीन धारा पवित्र या ।
मंगलमय त्या जाती पूर्व दिशेला तश्या ॥12॥

सुचक्षुश्चैव सीता च सिन्धुश्चैव महानदी ।
तिस्रश्चैता दिशं जग्मु: प्रतीची तु दिशं शुभा: ॥13॥

महानदी सुचक्षु सीता तीन या पश्चिमेकडे ।
शुभ धारा गंगेच्या या प्रवाहित होति त्या ॥13॥

सप्तमी चान्वगात तासां भगीरथरथं तदा ।
भगीरथोऽपि राजर्षिर्दिव्यं स्यंदनमास्थित: ॥14॥

प्रायादग्रे महातेजा गंगा तं चाप्यनुव्रजत ।
गगनाच्छंकरशिरस्ततो धरणिमागता ॥15॥

भगीरथाच्या रथास धारा सातवि अनुसरे ।
आरूढ भगिरथ होत रथी दिव्य पुढे पुढे ॥14॥
अशा प्रकारे गंगा आकाशातुन मस्तकी ।
शिवाच्या तेथुनी येई पृथ्वीवरती ती अशी ॥15॥

असर्पत जलं तत्र तीव्रशब्दपुरस्कृतम् ।
मत्स्यकच्छपसंघश्च शिंशुमारगणैस्तथा ॥16॥

पतद्भिः पतितैश्चैव व्यरोचत वसुंधरा ।

गंगा कलकल नादे गतीने तीव्र वाहते ।
तिच्यात पडती मत्स्य कच्छप शिंशुमारही ॥16॥
जलचरांच्या मुळे त्या हो शोभित वसुन्धरा ।

ततो देवर्षिगन्धर्वा यक्षसिद्धगणास्तथा ॥17॥
व्यलोकयन्त ते तत्र गगनाद् गां गतां तदा ।
विमानैर्नगराकारैर्हयैर्गजवरैस्तदा ॥18॥

देवता,ऋषि,गन्धर्व यक्ष सिद्धगणहि ते ।

बैसुनी नगराकारी विमानी,गज अश्वही ।
बैसुनी बघती गंगा कशी पृथ्वीवर येतसे ॥18॥

पारिप्लवगताश्चापि देवतास्तत्र विष्ठिता:।
तदद्भुतमिमं लोके गंगावतरणमुत्तमम् ॥19॥
दिदृक्षयो देवगणा: सम्य़ूरमितौजस:।

आश्चर्ये पाहती देव उभे राहुनिया तिथे ।
गंगावतरणाचे ते दृष्य अद्भुत पाहण्या ॥19॥
अनेक तेजस्वी देव जमती समुहे तिथे ।

सम्पतद्भि: सुरगणै: तेषां चाभरणौजसा ॥20॥
शतादित्यभिवाभाति गगनं गततोदयम् ।

दिव्य आभूषित देवांच्या प्रकाशे भरुनी नभ ॥20॥
वाटे निर्मल त्यामध्ये शत सूर्य प्रकाशति ।

शिंशुमारोरगगणैर्मीनैरपि च चंचलै: ॥21॥
विद्युद्भिरिव विक्षिप्तैराकाशमभवत तदा ।

मत्स्य चंचल शिंशुमार समूह हालति तसे ॥21॥
विद्युत्प्रकाशच सर्वत्र भरुनि चंचल राहिला ।

पाण्डुरै: सलिलोत्पीडै: कीर्यमाणै: सहस्रधा ॥22॥
शारदाभ्रेरिवाकीर्णं गगनं हंससम्प्लवै: ।

पाण्यावर दिसे फेस सहस्रधा शुभ्र त्यामुळे ॥22॥
भासे उडती हंस वा शुभ्र अभ्र शरदातले ।

क्वचित द्रुततरं याति कुटिलं क्वचिदायतम ॥23॥
विनतं क्वचिदुद्भूतं क्वचिद् याति शनै: शनै: ।
सलिलेनैव सलिलं क्वचिदभ्याहतं पुन: ॥24॥

तीव्र वेगे कधी मन्द आकुंचित वा विस्तृत ॥23॥

प्रवाह वरखाली होत सपाट भूमित सन्थ हो ।
कधी स्वजले येई उचंबळुन जल तिचे ॥24॥

मुहुरूर्ध्वपथं गत्वा पपात वसुधां पुनः ।
तच्छंकरशिरोभ्रष्टं भ्रष्टं भुमितले पुनः ॥25॥
व्यरोचत तदा तोयं निर्मलं गतकल्मषम् ।

प्रवाह हा गंगेचा उंच जात खाली कधी ।
आकाशातुन ये खाली शिवाच्या मस्तकातुनी ॥25॥
निर्मल जल ते शुभ्र पवित्रहि शोभते ।

तत्रर्षिगणगन्धर्वा वसुधातलवासिन: ।।26।।
भवांगपतितं तोयं पवित्रमिति पस्पृशु:।

भूतलनिवासी गन्धर्व ऋषि आचमति जल ।।26।।
जाणुनी पवित्र असे शिवमस्तक पतित ते।।

शापात प्रपतिता ये च गगनाद् वसुधातलम् ।।27।।
कृत्वा तत्राभिषेकं ते बभूवुर्गतकल्मषा: ।
धूतपापा: पुनस्तेन तोयेनाथ शुभान्विता: ।।28।।
पुनराकाशमाविश्य स्वांल्लोकान् प्रतिपेदिरे ।

झाल्यामुळे शापभ्रष्ट येति आकाशातून जे ॥27॥
होति गंगाजले स्नाने निष्पाप वसुधेवरि ।
जले धुतले जाता पुण्यलाभ पुन्हा तयां॥28॥
आकाशी जाउनी आपल्या लोकांप्रति पोचती ।

मुमुदे मुदितो लोकस्तेन तोयेन भास्वता ॥29॥
कृताभिषेको गंगायां बभूव गतकल्मषः ।

प्रकाशित जलसम्पर्कें सर्व आनंदित जगत ॥29॥
पापमुक्त होती सर्व गंगास्नान करुनिया ।

भगीरथो हि राजर्षिर्दिव्यं स्पंदनमास्थित: ॥30॥
प्रासादाग्रे महाराजस्तं गंगा पृष्ठतोऽन्वगात ।

भगीरथ राजर्षि दिव्य रथी आरूढ होउनी ॥30॥
पुढ्ती जाता गंगा जात त्यामागे असे ॥

देवा: सर्षिगणा: सर्वे दैत्यदानवराक्षसा:॥31॥
गन्धर्वयक्षप्रवरा: सकिन्नरमहोरगा।
सर्पाश्च्याप्सरसोराम भगीरथरथानुगा: ॥32॥
गंगामन्वगमन्‍ प्रीता: सर्वे जलचराश्च ये ।

ऋषिगण देव सर्व दैत्यदानवराक्षस ॥31॥

गन्धर्वयक्ष किन्नरही महोरग प्रवरही तसे
भगीरथामागे जाती अप्सरांमवेतही ॥32॥
जलचर तसे मोदे गंगेमागुनि धावती ।

यतो भगीरथो राजा ततो गंगा यशस्विनी ॥33॥
जगाम सरितां श्रेष्ठा सर्वपापप्रणाशिनी ।

जिकडे भगीरथ जात तिकडे गंगा यशस्विनी ॥33॥
जात ती सरिता श्रेष्ठ नाशी पापांस सर्व जी ।

ततो हि यजमानस्य जोरद्भुतकर्मण: ॥34॥
गंगा सम्प्लावयामास यज्ञवाटं महात्मन: ।

मार्गावरी करी यज्ञ जन्हु राजा तेधवा ॥34॥
नेतसे वाहुनी गंगा यज्ञाच्या मंडपा तदा ।

तस्यावलेपनं ज्ञात्वा कृद्धो जन्हुश्च राघव ॥35॥
अपिबत् तु जलं सर्व गंगाया: परमाद्भुतम् ।

राघवा कोपुनी राजा गंगेचा गर्व जाणुनी ॥35॥
जल सर्व तिचे टाकी पिऊन अद्भुत कृत्य हे ।

ततो देवा: सगन्धर्वा ऋषयश्च सुविस्मिता: ||36||
पूजयन्ति महात्मानं जन्हुं पुरुषसत्तमम् |

तेव्हा विस्मित देव गन्धर्व ऋषिही तसे ||३६||
महात्मा जन्हूची पूजा करुनी स्तुती तशी |

गंगा चापि नयन्ति स्म दुहितृत्वे महात्मन: ||37||
ततस्तुष्टो महातेजा: श्रोत्राभ्यामसृजत प्रभु: |
तस्मज्जनुसुता गंगा प्रोच्यते जान्हवीति च ||38||

कन्या म्हणति गंगेस राजा जन्हुची तिला ||37||

त्यामुळे होत संतुष्ट कानातुनि सोडि तो तिला ।
त्यामुळे जन्हुची कन्या म्हणुनी ती होइ जान्हवी ॥38॥

जगाम च पुनर्गंगा भगीरथरथानुगा ।
सागरं चापि सम्प्राप्ता  सा सरिताप्रवरा तदा ॥39॥
रसातलमुपागच्छत सिध्यर्थं तस्य कर्मण: ।

पुन्हा तेथुनिया गंगा भगीरथा अनुसरे ।
आणि नदी श्रेष्ठ पोचली सागराप्रति ॥39॥
रसातलास जाई कार्या पितरा उद्धरण्या ।

भगीरथोऽपि राजर्षिर्गंगामादाय यत्नत: ॥40॥
पितामहान्‍ भस्मकृतानपश्यद्‍ गतचेतन: ।

भगीरथ गंगेस जात घेउनिया जिथे ॥40॥
शापाने भस्म होऊनी पितामह अचेतन ।

अथ तद्भस्मनां राशिं गंगासलिलमुत्तमम्‍ ।
प्लावयत पूतपाप्मान: स्वर्गं प्राप्ता रघूत्तम ॥41॥

गंगाजले भस्मराशि आप्लावित करूनिया ।
राजपुत्र ते निष्पाप होउनी स्वर्गि पोचती ॥41॥

# इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे त्रिचत्वारिंश: सर्ग: ॥43॥

# रामायण बालकाण्ड सर्ग 44

स गत्वा सागरं राजा गंगयानुगतस्तदा ।
प्रविवेश तलं भूमेर्यत्र ते भस्मसात्कृता: ॥1॥
भस्मन्यथाप्लुते राम गंगाया: सलिलेन वै ।
सर्वलोकप्रभुर्ब्रह्मा राजानमिदमब्रवीत ॥2॥

गंगेस घेउनी जाई भगीरथ समुद्राप्रति ।
रसातळी भस्मसात जेथ पूर्वज जाहले ॥1॥

आप्लावित भस्मराशी गंगाजले करीतसे ।
सर्वलोका स्वामी ब्रह्मा राजास म्हणती असे ॥2॥

तारिता नरशार्दूल दिवं याताश्च देववत ।
षष्टि: पुत्रसहस्राणि सगरस्य महात्मन: ॥3॥

षष्ठिसहस्र पुत्रांचा उद्धार नरशार्दूला ।
महात्मा सगराच्या केलास स्वर्गी जात ते ॥3॥

सागरस्य जलं लोके यावस्थास्यति पार्थिव ।
सगरस्यात्मजा: सर्वे दिवि स्थास्यन्ति देववत ॥4॥

सागराचे जल या लोकी असेतो भूमीवरी ।
सगरपुत्र स्वर्गात असतील प्रतिष्ठित ॥4॥

इयं च दुहिता ज्येष्ठा तव गंगा भविष्यति ।
त्वत्कृतेन च नाम्नाय लोके स्थास्यति विश्रुता ॥5॥

गंगा ज्येष्ठ तुझी कन्या म्हणुनी जाणलि जाइल।
भागीरथी तव नामे ख्यात होइल ती जगी ॥5॥

गंगा त्रिपथगा नाम दिव्या भागीरथीति च ।
त्रीन् पथो भावयन्तीति तस्मात त्रिपथगा स्मृता ॥6॥

गंगा त्रिपथगा नामे भागिरथी दिव्य ज्ञात ती ।
तीन मार्ग आक्रमिले म्हणुनी त्रिपथगा अशी ॥6॥

पितामहानां सर्वेषां त्वमत्र मनुजाधिप ।
कुरुष्व सलिलं राजन्प्रतिज्ञामपवर्जय ॥7॥

मनुजाधिपा तू आता पितामहांची आपुल्या ।
उदकक्रिया करुनी प्रतिज्ञा कर पूर्ण तू ॥7॥

पूर्वकेण हि ते राजन्प्रतिज्ञामपवर्जय ।
धर्मिणां प्रवरेणाथ नैव प्राप्तो मनोरथः ॥8॥

तव पूर्वज हे राजा सगर श्रेष्ठ कीर्तिमान ।
धर्मनिष्ठ असोनीया सिद्ध ना ने मनोरथ ॥8॥

तथैवांशुमता वत्स लोकेऽपरतिमतेजसा ।
गंगा प्रार्थयता नेतुं प्रतिज्ञा नापवर्जिता ॥9॥

अंशुमानहि तेजस्वी गंगा आणण्या उत्सुक ।
परि त्यालाहि ना शक्य प्रतिज्ञापूर्ति साधणे ॥9॥

राजर्षिणा गुणवता महर्षिसम तेजसा ।
मत्तुल्य तपसा चैव क्षत्रधर्मस्थितेन च ॥10॥

दिलीपेन महाभाग तव पित्रातितेजसा ।
पुनर्न शकिता नेतुं गंगां प्रार्थयतानघ ॥11॥
सा त्वया समतिक्रान्ता प्रतिज्ञा पुरुषर्षभ ।
प्राप्तोऽसि परमं लोके यश: परमसंमतम् ॥12॥
तच्च गंगावतरणं त्वया कृतमरिन्दम ।
अनेन च भवान्प्राप्तो धर्मस्यायतनं महत ॥13॥

राजर्षि तसा गुणवान् तेजस्वी महर्षिसम ।
तपस्वींसम जो तेजे तपे मजबरोबरी ॥10॥

क्षात्रधर्मे वागणारा दिलीप जो तुझा पिता ।
समर्थ तोहि न झाला गंगेला आणण्यास्तव ॥11॥
ती प्रतिज्ञा करसी पूर्ण पुरुषश्रेष्ठा त्यामुळे ।
परमयश तुला लाभे या लोकी परमसंमत ॥12॥
गंगावतरण ते होई शक्य शत्रुघ्ना तुला ।
त्यामुळे तुला प्राप्त धर्मयुक्त महान स्थान ॥13॥

प्लावयस्य त्वमात्मानं नरोत्तम सदोचिते ।
सलिले पुरुषश्रेष्ठ शुचिः पुण्यफलो भव ॥14॥

पवित्र सदा जे स्नान कर तूहि नरोत्तमा ।
पवित्र होउनिया घे त्याचे पुण्यप्रद फल ॥14॥

पितामहानां सर्वेषां कुरुष्व सलिलक्रियाम् ।
स्वस्ति तेऽस्तु गमिष्यामि स्वं लोकं गम्यतां नृप ॥15॥

तर्पणा पितामहांच्या सर्वांच्या करुनि तुवा ।
कल्याण असो मी जातो स्वलोका तूही जा तसे ॥15॥

इत्येवमुक्त्वा देवेश: सर्वलोकपितामह: ।
यथागतं तथागच्छद् देवलोकं महायशा: ॥16॥

एवढे बोलुनि देवेश सर्वलोकपितामह ।
महायशस्वी ते गेले पुन्हा देवलोकाप्रति ॥16॥

भगीरथस्तु राजर्षि: कृत्वा सलिलमुत्तमम् ।
यथाक्रमं यथान्यायं सागराणां महायशा: ॥17॥
कृतोदक: शुची राजा स्वरं प्रविवेश ह ।
समृद्धार्थो नरश्रेष्ठ स्वराज्यं प्रशशास ह ॥18॥

राजर्षि भगीरथही गंगाजलाने उत्तम ।
यथाक्रम यथायोग्य सागरांचे महायश ॥17॥

विधिवत तर्पण करुनी पवित्र स्वनगराप्रति ।
मनोरथ पूर्ण झालेला स्वराज्य शासन करी ॥18॥

प्रमुमोद च लोकस्तं नृपमासाद्य राघव ।
नष्टशोक: समृद्धार्थो बभूव विगतज्वर: ॥19॥

राघवा आपुला राजा आला परत पाहुनी ।
शोकरहित आनंदी चिन्तामुक्त प्रजा बने ॥19॥

एष ते राम गंगाया विस्तरोऽभिहितो मया ।
स्वस्ति प्राप्नुहि भद्रं ते संध्याकालोऽतिवर्तते ॥20॥

विस्तारे तुज रामा ही गंगेची कथिली कथा ।
कल्याण तव असो आता संध्यासमय जाहला ॥20॥

धन्यं यशस्यमायुष्यं पत्र्यं स्वर्ग्यमथापि च ।
य: श्रावयति विप्रेषु क्षत्रियेष्वितरेषु च ॥21॥
प्रीयन्ते पितरस्तस्य प्रीयन्ते दैवतानि च ।
इदमाख्यानमायुष्यं गंगावतरणं शुभम् ॥22॥

गंगावतरण आख्यान आयुष्य करि वर्धन ।
स्वर्ग धन,यश,पुत्र मिळवुनी देतसे ॥21॥

ब्राह्मणा, क्षत्रिया, अन्या सर्वांना ऐकवेल जो ।
आनन्दित पितर त्याचे होतील देवता तश्या ॥22॥

य: श्रुणोति च काकुत्स्थ सर्वान्‍ कामनवाप्नुयात ।
सर्वे पापा: प्रणश्यन्ति आयु: कीर्तिश्च वर्धते ॥23॥

श्रवण जो करि काकुत्स्था सर्व इच्छापूर्ति तया ।
पापे नाशति त्याची कीर्ति आयुष्य वाढते ॥23॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे चतुश्चत्वारिंश: सर्ग: ॥44॥**

# रामायण बालकाण्ड सर्ग 45

विश्वामिवच: श्रुत्वा राघव: सहलक्ष्मण:।
विस्मयं परमं गत्वा विश्वामित्रमथाब्रवीत ॥1॥

विश्वामित्रांचे ते बोल लक्ष्मणासह ऐकुनी ।
परम आश्चर्य वाटून त्याना राम म्हणे असे ॥1॥

अत्यद्भुतमिदं ब्रह्मन कथितं परमं त्वया ।
गंगावतरणं पुण्यं सागरस्यापि पूरणम ॥2॥

आचार्य कथिले आम्हा परम हे अद्भुत असे ।
अवतरण गंगेचे समुद्रा मिळणे तसे ॥2॥

क्षणभूतैव नौरात्रि: संवृत्तेयं परंतप ।
इमां चिन्तयतो: सर्वां निखिलेन कथां तव ॥3॥

कथेचे आपल्या पूर्ण आम्ही करिता चिन्तन ।
क्षणात आम्हा दोघांची रात्र जाइ न हे कळे ॥3॥

तस्य सा शर्वरी सर्वा मम सौमित्रिणा सह ।
जगाम चिन्तयानस्य विश्वामित्र कथां शुभाम् ॥4॥

कथेवर मुनिवर त्या लक्ष्मणासह चिन्तिता ।
जातसे रात्र सम्पूर्ण विचार करिता तिचा ॥4॥

ततः प्रभाते विमले विश्वामित्रं तपोधनम् ।
उवाच राघवो वाक्यं कृताह्निकमरिन्दमः ॥5॥

प्रभाते निर्मल होता विश्वामित्रांचे आह्निक ।
जाउनी त्यांच्याजवळी पुसे राघव यापरी ॥5॥

गता भगवती रात्रिः श्रोतव्यं परमं श्रुतम् ।
तराम सरितां श्रेष्ठां पुण्यां त्रिपथगां नदीम् ॥6॥

पूजनीय गेली रात्र ऐकता उत्तम कथा ।
तरी पार करू आता श्रेष्ठ त्रिपथगा नदी ॥6॥

नौरेषा हि सुखास्तीर्णा ऋषीणां पुण्यकर्मणाम् ।
भगवन्तमिहं प्राप्तं ज्ञात्वा त्वरितमागता ॥7॥

पुण्यवान् ऋषिजनांची नाव येथ उपस्थित ।
सुखासने असे युक्त धाडती सत्वर तिला ॥7॥

तस्य तद् वचनं श्रुत्वा राघवस्य महात्मन: ।
संतारं कारयामास सर्षिसंघस्य कौशिक: ॥8॥

महात्मा राघवाचे ते ऐकुनी बोल कौशिक ।
ऋषींसह पाठवीती त्या दोघांना पलीकडे ॥8॥

उत्तरं तीरमासाद्य संपूज्यर्षिगणं ततः ।
गंगाकूले निविष्टास्ते विशालां ददृशुः पुरीम् ॥9॥

नंतर ते स्वतः जाती करुनी सत्कार तेथल्या।
ऋषींचा मग ते सर्व विशाला पुरि पाहती ॥9॥

ततो मुनीवरस्तूर्णं जगाम सहराघवः ।
विशाला नगरीं रम्यां दिव्यां स्वर्गोपमां तदा ॥10॥

नन्तर रामलक्ष्मणा संगे जाउनीया मुनीवर ।
स्वर्गोपमा विशाला त्या दिव्य नगरीप्रति ॥10॥

कतमो राजवंशोऽयं विशालायां महामुने:।
श्रोतुमिच्छामि भद्रं ते परं कौतूहलं हि मे ॥11॥

राजवंश कोणता या विशाला नगरीमध्ये ।
जाणण्या उत्सुक आहे सांगा आपण ते आम्हा ॥11॥

अथ रामो महाप्राज्ञो विश्वामित्रं महामुनिम् ।
पप्रच्छ प्रांजलिर्भूत्वा विशालामुत्तमाम् पुरीम् ॥12॥

तेव्हां राम महाप्राद्न्य विचारी हात जोडून ।
महामुनि विश्वामित्रां विशाला पुरीबद्दल ॥12॥

तस्य तद्वचनं श्रुत्वा रामस्य मुनिपुङ्गवः।
आख्यातुं तत्समारेभे विशालायाः पुरातनम् ॥13॥

विश्वामित्र मुनिश्रेष्ठ राम वचना ऐकुनी ।
इतिहास पुरीचा त्या सांगाया लागती तया ॥13॥

श्रूयतां राम शक्रस्य कथां कथयतः श्रुताम् ।
अस्मिन् देशे हि यद्वृत्तं श्रृणु तत्वेन राघव ॥14॥

इंद्राने सांगितली जी कथा त्याविषयी मला ।
याच देशात घडलेला ऐेक इतिहास सांगतो ॥14॥

पूर्वं कृतयुगे राम दितेः पुत्राः महाबलाः।
अदितेश्च महाभागा वीर्यवन्तः सुधार्मिकः ॥15॥

कृतयुगी दितीपुत्र दैत्य रामा पराक्रमी ।
अदितीचेही तसे वीर धर्मशालीहि देवता॥15॥

तत्स्तेषां नरव्याघ्र बुद्धिरासीन्महात्मनाम् ।
अमरा विजराश्चैव कथं स्यामो निरामयाः ॥16॥

नरव्याघ्रा दोघांच्या त्या विचार मनि येतसे ।
व्हायचे आपण कैसे निरोगी अजरामर ॥16॥

तेषां चिन्तयतां तत्र बुद्धिरासीद विपश्चिताम् ।
क्षीरोदमन्थनं कृत्वा रस प्राप्स्याव तत्र वै ॥17॥

विचार करता त्यांनी विचार सुचला तयां ।
सागरमन्थन केल्याने मिळेल रस अमृत ॥17॥

ततो निश्चिन्त्य मथनं योक्त्रं कृत्वा च वासुकिम् ।
मन्थानं मन्दरं कृत्वा ममन्थुरमितौजस:॥18॥

तेव्हां मन्थन योजून मन्दरा करुनी रवी ।
वासुकीस दोरी करुनी मथिती क्षीरसागर ॥18॥

अथ वर्षसहस्रेण योक्त्रसर्पशिरांसि च ।
वमन्तोऽतिविषं तत्र ददंशुर्दशनैः शिलाः ॥19॥

सहस्र वर्षाअन्ती दोरिरूपात वासुकी ।
मन्दरा अनेक मुखे विषयुक्त दांते डसे ॥19॥

उत्पपाताग्निसंकाशं हालाहलमहाविषम् ।
तेन दग्धं जगत सर्वं सदेवासुरमानुषम् ॥20॥

अग्निसमान उत्पन्न हालाहल महाविषे ।
असुर मानव देव दग्ध व्हाया लागले ॥20॥

अथ देवा महादेवं शंकरं शरणार्थिन:।
जग्मु: पशुपतिं रुद्रं त्राहि त्राहीति तुष्टवु: ॥21॥

तेव्हां देव महादेवा जाती शरण शंकरा ।
त्राहि त्राहि म्हणुनी ते तयाची करती स्तुति ॥21॥

एवमुक्तस्ततो देवैर्देवदेवेश्वर: प्रभु: ।
प्रादुरासीत ततोऽत्रैव शंखचक्रधरो हरि: ॥22॥

धावा ऐकुनिया येती देवदेवेश्वर शंकर ।
शंखचक्रगदाधारी हरिही येती तिथे तसे ॥22॥

उवाचैनं स्मितं कृत्वा रुद्रं शूलधरं हरिः।
देवतैर्मथ्यमाने तु यत्पूर्वं समुपस्थितम् ॥23॥
तत् त्वदीयं सुरश्रेष्ठ सुराणामग्रतो हि यत् ।
अग्रपूजामिह स्थित्वा गृहाणेदं विषं प्रभो ॥24॥

त्रिशूलधारी रुद्रास बोले हसुनि श्रीहरि ।
मन्थनातुन पहिले जे निघे असे ते आपले ॥23॥

असल्याने सुरश्रेष्ठ अग्रपूजा म्हणूनिया ।
निघाले विष राहून येथेच प्राशन करा ॥24॥

इत्युक्त्वा च सुरश्रेष्ठस्तत्रैवान्तरधीयत ।
देवतानां भयं दृष्ट्वा श्रुत्वा वाक्यं तु शाङ्गिण:॥25॥
हालाहलं विषं घोरं संजग्राहामृतोपमम् ।
देवान् विसृज्य देवेशो जगाम भगवान् हर: ॥26॥

असे बोलुनिया विष्णु होति अन्तर्धान ते ।
भय पाहुनि देवांचे ,विष्णुवाक्यास ऐकुनी ॥25॥

हालाहल विष प्राशी अमृतापरि रुद्र ते ।
देवांना सोडुनी जाति स्वस्थानि भगवान हर ॥26॥

ततो देवासुरा: सर्वे ममन्थू रघुनन्दन ।
प्रविवेशाथ पातालं मन्थान: पर्वतोत्तम: ॥27॥

पुन्हा मन्थन करण्या देवासुर लागती जसे।
पर्वतोत्तम रवी तो पाताळी घुसु लागला ॥27॥

ततो देवा: सगन्धर्वास्तुष्टुवुर्मधुसूदनम् ।
त्वं गति: सर्वभूतानां विशेषेण दिवौकसाम् ॥28॥

पालयास्मान्‍ महाबाहो गिरिमुद्धर्तुमर्हसि ।

सर्व देव नि गन्धर्व स्तुवती मधसूदना ।
म्हणती आपण गति सर्वां देवां विशेषत: ॥28॥
उचलुनी पर्वता या करा रक्षण आमुचे ।

इति श्रुत्वा हृषीकेश: कामठं रूपमास्थित: ॥29॥
पर्वतं पृष्ठत: कृत्वा शिश्ये तत्रोदधौ हरि: ।

ऐकुनी हे हृषीकेश कूर्मरूपास धारुनी ॥29॥
मन्दरा घेउनी पृष्ठी समुद्रातच राहती ।

पर्वताग्रं तु लोकात्मा हस्तेनाक्रम्य केशव: ॥30॥
देवानां मध्यत: स्थित्वा ममन्थ पुरुषोत्तम: ।

स्वहस्ते केशव विश्वात्मा मन्दरशिखरा धरी ॥30॥
राहुनीया देवांमध्ये समुद्रमन्थन करी ।

अथ वर्षसहस्रेण आयुर्वेदमय: पुमान ॥31॥
उदतिष्ठत सुधर्मात्मा सदन्ड: सकमण्डलु:।
अथ धन्वंतरिर्नाम अप्सराश्च सुवर्चस:।॥32॥

वर्षे सहस्र जाता पुरुष आयुर्वेदमय ॥31॥

प्रकटे ज्याच्या हाती दण्ड आणि कमण्डलु ।
धन्वंतरि नामे येती नन्तर सुन्दर अप्सरा ॥32॥

अप्सु निर्मथनादेव रसात तस्माद् वरस्त्रियः।
उत्पेतुर्मनुजश्रेष्ठ तस्मादप्सरसोऽ भवन ॥33॥

मन्थने जला(आप)तुनि निघती(सरा) म्हणुनी ।
अप्सरा नामे वदती ललनांना त्या सुन्दर ॥33॥

षष्टिः कोट्योऽभवंस्तासामप्सराणां सुवर्चसाम ।
असंख्येयास्तु काकुत्स्थ यास्तासां परिचारिकाः ॥34॥

काकुत्स्था साठसहस्र अप्सरांची संख्या असे ।
आणि त्यांच्या समवेत अगणित परिचारिका ॥34॥

न ताः स्म प्रतिगृह्यन्ति सर्वे ते देवदानवाः।
अप्रतिग्रहणादेव ता वै साधारणाः स्मृताः ॥35॥

देवदानव ना घेती पत्नी म्हणुनी अप्सरां ।
त्यामुळे मानती त्यांना साधारण म्हणूनिया ॥3५॥

वरुणस्य ततः कन्या वारुणी रघुनंदन ।
उत्पपात महाभागा मार्गमाणा परिग्रहम् ॥36॥

वारुणी वरुणकन्या प्रकटे रघुनन्दना ।
शोधिते पुरुषा ऐशा स्विकार करि जो तिचा ॥36॥

दितेः पुत्रा न तां राम जगृहुर्वरुणात्मजाम् ।
अदितेस्तु सुता वीर जगृहुस्तामनिन्दिताम् ॥37॥

स्वीकारति न तिला रामा दितीपुत्र परी तिला।
स्वीकारती अदितीचे अतिसुन्दर जी असे ॥37॥

उच्चैःश्रवा हयश्रेष्ठो मणिरत्नं च कौस्तुभम् ।
उदतिष्ठन्नरश्रेष्ठ तथैवामृतमुत्तमम् ॥38॥

त्यानंतर नरश्रेष्ठा उच्चै:श्रवा हयश्रेष्ठ जो ।
श्रेष्ठ ते कौस्तुभरत्न आणि अमृत उत्तम ॥38॥

उच्चै:श्रवा हयश्रेष्ठो मणिरत्नं च कौस्तुभम् ।
उदतिष्ठन्नरश्रेष्ठ तथैवामृतमुत्तमम् ॥39॥

उच्चै:श्रवा अश्वश्रेष्ठ मणिरत्नहि कौस्तुभ ।
अमृत परमोत्तमही असे निघति नंतर ॥39॥

अथ तस्य कृते राम महानासीत् कुलक्षय: ।
अदितेस्तु तत: पुत्रा दितिपुत्रानयोधयन् ॥40॥

अमृतासाठि हे रामा देवी दैत्यी भयंकर ।
युद्ध होउनिया तेव्हां कुलक्षय होतसे महा ॥40॥

एकतामगमन् सर्वे असुरा राक्षसैः सह ।
युद्धमासीन्महाघोरं वीर त्रैलोक्यमोहनम् ॥41॥

एकत्र येउनी असुर राक्षसांच्या बरोबर ।
देवांशी करती घोर युद्ध त्रैलोक्य हादरे ॥41॥

यदा क्षयं गतं सर्वं तदा विष्णुर्महाबलः।
अमृतं सोऽहरत् तूर्णं मायामास्थाय मोहिनीम् ॥42॥

दले क्षीण उभय होता भगवान विष्णु महाबळी ।
येऊन मोहिनीरूपे अमृता पळवीति ते ॥42॥

ये गताभिमुखं विष्णुमक्षरं पुरुषोत्तमम् ।
सम्पिष्टास्ते तदा युद्धे विष्णुना प्रभविष्णुना ॥43॥

दैत्य जे अमृतासाठी लढती विष्णूबरोबर ।
निर्दालन त्या सर्वांचे करती विष्णु पराक्रमी ॥43॥

अदितेरात्मजा वीरा दिते: पुत्रान् निजघ्निरे ।
अस्मिन् घोरे महायुद्धे दैतेयादित्ययोर्भृशम् ॥44॥

देवता आणि दैत्यांच्या घोर युद्धात वीर जे ।
करिती अदितीपुत्र दैत्यसंहार घोर तो ॥44॥

निहत्य दितिपुत्रांस्तु राज्यं प्राप्य पुरंदरः ।
शशास मुदितो लोकान् सर्षिसंघान् सचारणान् ॥45॥

असा संहार दैत्यांचा राज्य इंद्रा मिळे तदा ।
प्रसन्न होत करी तो राज्य ऋषि चारणांसवे ॥45॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे आदिकाव्ये बालकाण्डे पंचचत्वारिंशः सर्गः ॥45॥**

# रामायण बालकांड सर्ग 46

हतेषु तेषु पुत्रेषु दितिः परमदुःखिता ।
मारीचं कश्यपं नाम भर्तारमिदमब्रवीत ॥1॥

मरणे सर्व पुत्रांच्या दिति हो अतिदुःखित।
वदे जाउनी पतिला मरिचिपुत्र कश्यपा ॥1॥

हतपुत्रास्मि भगवंस्तव पुत्रौर्महाबलैः ।
शक्रहन्तारमिच्छामि पुत्रं दीर्घतपोर्जितम् ॥2॥

मारिले मम पुत्रांना तव पुत्रानी पराक्रमी ।
मज दीर्घ तपे व्हावा पुत्र इन्द्रास मारि जो ॥2॥

साहं तपश्चरिष्यामि गर्भ मे दातुमर्हसि ।
ईश्वरं शक्र हंतारं त्वमनुज्ञातुमर्हसि ॥3॥

ऐसे तप करण्यास अनुज्ञा द्यावी ज्यामुळे ।
इन्द्रा वधी असा पुत्र गर्भात मम प्राप्त हो ॥3॥

तस्यास्तद वचनं श्रुत्वा मारीचः कश्यपस्तदा ।
प्रत्युवाच महातेजा दितिं परमदुःखिताम ॥4॥

तिचे वचन ऐकूनी कश्यप मरिचीपुत्र जे ।
महातेजस्वी वदती दितीस अति दु:खित ॥4॥

एवं भवतु भद्रं ते शुचिर्भव तपोधने ।
जनयिष्यसि पुत्रं त्वं शक्रहंतारमाहवे ॥5॥

तपाने पवित्र होता कल्याण तव होइल ।
पुत्रा जन्म देशील इन्द्रास जो मारू शके ॥5॥

पूर्णे वर्षसहस्रे तु शुचिर्यदि भविष्यसि ।
पुत्रं त्रैलोक्यहन्तारं मत्तस्त्वं जनयिष्यसि ॥6॥

तू सहस्त्र वर्षे पूर्ण पवित्र जर राहसी ।
इन्द्रा वधणारा पुत्र मिळेल मजपासुनी ॥6॥

एवमुक्त्वा महातेजा: पाणिना सम्ममार्ज ताम् ।
तामालभ्य तत: स्वस्ति इत्युक्त्वा तपसे ययौ ॥7॥

असे म्हणुनि देहास हस्ते स्पर्शूनिया तिच्या ।
कल्याण तिचे इच्छूनि तप करण्या जाति ते ॥7॥

गते तस्मिन् नरश्रेष्ठ दिति परमहर्षिता ।
कुशाप्लवं समासाद्य तपस्तेपे सुदारुणम् ॥8॥

जाती जेव्हां नरश्रेष्ठा, दिति हर्षित होउनी ।
कुशप्लव वनी येई आरंभी तप दारुण ॥8॥

तपस्तस्यां हि कुर्वन्त्यां परिचर्यां चकार ह ।
सहस्राक्षो नरश्रेष्ठ परया गुणसम्पदा ॥9॥

रामा पुरुषश्रेष्ठा ती जेव्हां तप करीतसे ।
विनये इंद्र सहस्राक्ष सेवा तिचि करीतसे ॥9॥

अग्निं कुशान्काष्ठमप: फलमूलं तथैव च ।
न्यवेदयत्सहस्राक्षो यच्चान्यदपि कांक्षितम् ॥10॥

जल फल अग्नि काष्ठ कुशा मूल तशी फळे ।
आवश्यक अश्या वस्तु तिज आणुनि देतसे ॥10॥

गात्रसंवाहनैश्चैव श्रमापनयनैस्तथा ।
शक्रः सर्वेषु कालेषु दितिं परिचचार ह ॥11॥

दितीची करी सेवा श्रमहारक हो तिज ।
करण्यास सदा सज्ज परिचर्येस इन्द्र तो ॥11॥

पूर्णे वर्षसहस्रे सा दशोने रघुनन्दन ।
दितिः परमसंहृष्टा सहस्राक्षमथाब्रवीत् ॥12॥

वर्षे सहस्र होण्यास रामा दश राहता ।
हर्षे दिति इन्द्रास वदे हे रघुनन्दना ॥12॥

तपश्चरन्त्या वर्षाणि दश वीर्यवतां वर ।
अवशिष्टानि भद्रं ते भ्रातरं द्रक्षसे तथा ॥13॥

उरली फक्त दहा वर्षे वीरा कल्याण हो तुझे ।
पाहशील नंतर तू होणाऱ्या बंधुला तव ॥13॥

यमहं त्वत्कृते पुत्र तमाधास्ये जयोत्सुखम् ।
त्रैलोक्यविजयं पुत्रं सह भोक्षसि विज्वर ॥14॥

नाशण्या तुज जो पुत्र याचिला तयास मी ।
करीन शांत तुझ्यासंगे त्रैलोक्य विजया भोगण्या ॥14॥

याचितेन सुरश्रेष्ठ पित्रा तव महात्मना ।
वरो वर्षसहस्रान्ते मम दत्त: सुतम्‌ प्रति ॥15॥

सुरश्रेष्ठा वर प्राप्त पित्यापासुन मी तुझ्या ।
पुत्र वर्ष सहस्रान्ती लाभेल विजयी मला ॥15॥

इत्युक्त्वा च दितिस्तत्र प्राप्ते मध्यं दिनेश्वरे ।
निद्रयापहृता देवी पादौ कृत्वा शीर्षत: ॥16॥

बोलत असता देवी निद्राधीन दुपारची ।
अवस्थेत तिच्या शीर्ष पायावरि तिच्या झुके ॥16॥

दृष्ट्वा तामशुचिं शक्र: पादयो: कृतमूर्धजाम् ।
शिर:स्थाने कृतौ पादौ जहास च मुमोद च ॥17॥

पाहुनी तिला स्वशिरा पायी अपवित्र आसनी ।
हसला इन्द्र मनी तो आनंदित अति जाहला ॥17॥

तस्या: शरीरविवरं प्रविवेश पुरंदर: ।
गर्भं च सप्तधा राम विच्छेद परमात्मवान् ॥18॥

शरीरात तिच्या इंद्र अन्तर्भागि शिरूनिया ।
गर्भाचे त्या करी सात भाग विच्छेदुनी तया ॥18॥

भिद्यमानस्ततो गर्भो वज्रेण शतपर्वणा ।
रुरोद सुस्वरं राम ततो दितिरबुध्यत ॥19॥

शतपर्वण वज्राने जात बालक छेदला ।
रडे जोरजोराने त्यामुळे दिति जागृत ॥19॥

मा रुदो मा रुदश्चेति गर्भं शक्रोऽभ्यभाषत ।
बिभेद च महातेजा रुदन्तमपि वासव: ॥20॥

रडू नको असे इन्द्र गर्भास बजावत ।
परि रडणाऱ्या त्या गर्भास विच्छेदत असे ॥20॥

न हन्तव्यं न हन्तव्यमित्येव दितिरब्रवीत ।
निष्पपात ततः शक्रो मातुर्वचनगौरवम् ॥21॥

नको मारू तया इन्द्रा दिति वदतसे जंव ।
मातेच्या वचना मानी इन्द्र बाहेरि येतसे ॥21॥

प्रांजलिर्वज्रसहितो दितिं शक्रोऽभ्यभाषत ।
अशुचिर्देवि सुप्तासि पादयोः कृतमूर्धजा ॥22॥

तदन्तरमहं लब्ध्वा शक्रहन्तारमाहवे ।
अभिन्द सप्तधा देवि तन्मे त्वं क्षन्तुमर्हसि ॥23॥

वज्रासहित जोडून हात तो दितिला म्हणे ।
पायावर डोके ऐसी अपवित्र अवस्था तुझी ॥2२॥
लाभ घेउनि मी गर्भा इन्द्रहन्त्यास छेदिले ।
सात भागात या माझ्या अपराधा क्षमा करी ॥23॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे षट्चत्वारिंशः सर्गः ॥46॥**

# बालकाण्ड सर्ग 47

सप्तधा तु कृते गर्भे दितिः परमदुःखिता ।
सहस्राक्षं दुराधर्शं वाक्यं सानुनयाब्रवीत ॥1॥

गर्भाचे तुकडे सात झाल्याने अतिदुःखित ।
दिति दुराधर्ष इंद्रा बोले अनुनयपूर्वक ॥1॥

ममापराधाद् गर्भोऽयं सप्तधा शकलीकृतः।
मापराधो हि देवेश तयात्र बलसूदन ॥2॥

शकले गर्भाची सात माझ्याच अपराधामुळे ।
तुझा यात नसे दोष देवेशा बलसूदना ॥2॥

प्रियं त्वत्कृतमिच्छामि मम गर्भविपर्यये ।
मरुतां सप्त सप्तानां स्थानपाला भवन्तु ते ॥3॥

इच्छिते तव कल्याण गर्भाच्या विकृतीतुनी ।
खण्ड ते सात होतील  स्थानपाल मरुद्गण ॥3॥

वातस्कंधा इमे सप्त चरन्तु दिवि पुत्रक ।
मारुता इति विख्याता दिव्यरूपा ममात्मजा: ॥4॥

दिव्य पुत्र मम सात मारुत नामे होतिल ।
प्रसिद्ध आणि आकाशी वातस्कंधात राहती ॥4॥

टीप: आवह,प्रवह, संवह,उद्वह,विवह,परिवह,आणि परावह या सात मरुतांना वातस्कंद असे म्हणतात.

ब्रह्मलोकं चरत्वेक इन्द्रलोकं तथापर:।
दिव्यवायुरिति ख्यातस्तृतीयोऽपि महायशा: ॥5॥

पहिला ब्रह्मलोकात दुसरा इन्द्रलोकामध्ये ।
नामे वायु असा दिव्य तिसरा विख्यात अम्बरी ॥5॥

चत्वारस्तु सुरश्रेष्ठ दिशो वै तव शासनात ।
संचरिष्यति भद्रं ते कालेन हि ममात्मजा: ॥6॥

त्वत्कृतेनैव नाम्ना तै मारुता इति विश्रुता: ।

उरले जे चार संचार आज्ञेने करती तव ।
सुरश्रेष्ठा दिशा सर्व संचार करतील ते ॥6॥
तया “मा रुद “ म्हटलेस म्हणुनि विश्रुत मारुत ।

टीप: इंद्राने गर्भांना खण्डित करताना “मा रुद” म्हणजे रडू नको असे म्हटले होते.

तस्यास्तद् वचनं श्रुत्वा सहस्राक्षा पुरंदर:॥7॥
उवाच प्रांजलिर्वाक्यमतीदं बलसूदन:।

तिच्या ऐकुनिया बोला सहस्राक्ष बलसूदन ॥7॥

पुरंदर जोडुनी हात दितीस बोलला असे ।

सर्वमेतद् यथोक्तं ते भविष्यति न संशयः॥8॥
विचरिष्यन्ति भद्रं ते देवरूपास्तवात्मजाः।

कल्याण हो तव माते सर्व ऐसेच होईल ॥8॥
संचरतील हे सर्व देवरूपे तुझे सुत ।

एवं तौ निश्चयं कृत्वा मातापुत्रौ तपोवने ॥9॥
जग्मदुस्त्रिदिवं राम कृतार्थाविति नः श्रुतम् ।

तपोवनी निश्चय हा करुनी समाधानी ते ॥9॥

स्वर्गलोकी मातापुत्र जाती ते ऐकले असे ।

एष देशः स काकुत्स्थ महेन्द्राध्युषित पुरा ॥10॥
दितिं यत्र तपःसिद्धामेवं परिचचार सः॥

हा तो देश काकुत्स्था तपःसिद्ध दितीस्तव ॥10॥
राहुनिया जिथे इंद्र परिचर्या तिची करी ।

इक्ष्वाकोस्तु नरव्याघ्र पुत्रः परमधार्मिकः ॥11॥
अलम्बुषायामुत्पन्नो विशाल इति विश्रुतः।
तेन चासीदिहं स्थाने विशालेति पुरू कृता ॥12॥

विशाल नामे इक्ष्वाकूंचा पूर्वी परमधार्मिक ।
पुरुषसिंहा,पुत्राची माता अलम्बुषा असे ।
वसविली असे त्याने विशाला नामक पुरी ॥12॥

विशालस्य सुतो राम हेमचन्द्रो महाबलः।
सुचन्द्र इति विख्यातो हेमचन्द्रादनन्तरः॥13॥

पुत्र रामा विशालाचा हेमचन्द्र महाबली ।
सुचन्द्र नामे विख्यात हेमचंद्रास पुत्र जो ॥13॥

सुचन्द्रतनयो राम धूम्राश्व इति विश्रुतः ।

धूम्राश्वतनयश्चापि सृंजय: समपद्यत ॥14॥

सुचन्द्राचा असे पुत्र धूम्राश्व नामे विश्रुत ।
धूम्राश्वाचा तसा पुत्र नामे विख्यात सृंजय ॥14॥

सृंजयस्य सुत: श्रीमान् सहदेव: प्रतापवान् ।
कुशाश्व: सहदेवस्य पुत्र परमधार्मिक: ॥15॥

सृंजया पुत्र जो श्रीमान् सहदेव प्रतापवान् ।
कुशाश्व सहदेवाचा पुत्र जो परमधार्मिक ॥15॥

कुशाश्वस्य महातेजा: सोमदत्त: प्रतापवान्।

सोमदत्तस्य पुत्रस्तु काकुत्स्थ इति विश्रुत ॥16॥

कुशाश्वा अतितेजस्वी सोमदत्त प्रतापवान ।
सोमदत्तास काकुत्स्थ पुत्र विख्यात होतसे ॥16॥

तस्य पुत्रो महातेजा: सम्प्रत्येष पुरीमिमाम् ।
आवसत् परमप्रख्य: सुमति: नाम दुर्जय:॥17॥

काकुत्स्था महातेजस्वी सुमति नामे पुत्र हो ।
करी निवास पुरीमध्ये असे दुर्जय कान्तिमान ॥17॥

इक्ष्वाकोस्तु प्रसादेन सर्व वैशालिका: नृपा:।

दीर्घायुषो महात्मानो वीर्यवन्त: सुधार्मिका: ||18||

इक्ष्वाकूच्या प्रसादाने विशाल नगरीमध्ये ।
नरेश सर्व दीर्घायु ,वीर्यवान्,परमधार्मिक ||18||

इहाय रजनीमेकां सुखं स्वप्स्यामहे वयम् ।
श्व: प्रभाते नरश्रेष्ठ जनकं द्रष्टुमर्हसि ||19||

आज रात्री इथे राहू सुखे निद्रिस्त होउनी।
नरश्रेष्ठ उद्या जाऊ दर्शना जनकनृपा ||19||

सुमतिस्तु महातेजा विश्वामित्रमुपागतम्।

श्रुत्वा नरवरश्रेष्ठ: प्रत्यागच्छन्महायशा: ||20||

विश्वामित्र येती ऐसे नरवरश्रेष्ठ ऐकुनी ।
महातेजस्वी सुमति स्वागतास उपस्थित ||20||

पूजां च परमां कृत्वा सोपाध्याय: सबान्धव:|
प्रांजलि: कुशलं पृष्ट्वा विश्वामित्रमथाब्रवीत ||21||

पुरोहित बान्धवासंगे विश्वामित्रांस पूजुनी ।
पुसे जोडुनिया हात कुशल आणि तयां म्हणे ||21||

धन्योऽस्म्यनगृहीतोऽस्मि यस्य मे विषयं मने ।

सम्प्राप्तोदर्शनं चैव नास्ति धन्यतरो मम ॥22॥

मजवरी अनुग्रह हा येता स्वये मजकडे ।
लाभुनी दर्शन धन्य मजहूनि कुणी नसे ॥22॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डे सप्तचत्वारिंशः सर्गः॥47॥**

# बालकाण्ड सर्ग 48

पृष्ट्वा तु कुशलं तत्र परस्पर समागमे ।
कथान्ते सुमतिर्वाक्यं व्याजहार महामुनिम् ॥1॥

होता कुशल समाचार एकमेकांस भेटता ।
शेवटी सुमती राजा विश्वामित्रां विचारित ॥1॥

इमौ कुमारौ भद्रं ते देवतुल्यपराक्रमौ ।
गजसिंहगती वीरौ शार्दूलवृषभोपमौ ॥2॥

कुमार दिसती दोन देवतुल्यपराक्रमी ।
गजसिंह गती त्यांची शार्दूलवृषभासम ॥2॥

पद्मपत्रविशालक्षौ खड्गतूणधनुर्धरौ ।
अश्विनाविव रूपेण समुपस्थितयौवनौ ॥3॥

पद्मपत्रापरी नेत्र धनुर्धर खड्गही तसे ।
रूपे अश्विनीकुमार यौवनात प्रवेशती ॥3॥

यदृच्छैव गां प्राप्तो देवलोकदिवामरौ ।
कथं पद्भ्यामिह प्राप्तौ किमर्थं कस्य वा मुने ॥4॥

देवलोकातुनी वाटे येती पृथ्वीवर जणु ।
कुणाचे पुत्र हे येती स्वपदे चालुनी इथे ॥4॥

भूषयन्ताविमं देशं चन्द्रसूर्याविवाम्बरम् ।
परस्परेण सदृशौ प्रमाणेङ्गितचेष्टिते ॥5॥

चन्द्रसूर्यापरी देशा या भूषविति हे द्वय ।
देहयष्टी वर्तनही दोघांचे एकसारखे ॥5॥

किमर्थं च नरश्रेष्ठौ सम्प्राप्तौ दुर्गमे पथि ।
वरायुधधरौ वीरौ श्रोतुमिच्छामि तत्वत: ॥6॥

उत्तम शस्त्रांसहिता नरश्रेष्ठ कशास्तव ।
येति दुर्गम मार्गात जाणण्या मी हे इच्छितो ॥6॥

तस्य तद् वचनं श्रुत्वा यथावृत्तं न्यवेदयत ।
सिद्धाश्रमनिवासं च राक्षसानां वधं यथा ।
विश्वामित्रवच: श्रुत्वा राजा परमविस्मित: ॥7॥

तयाच्या ऐकुनी प्रश्ना वदती सर्ववृत्त त्यां ।
सिद्धाश्रमात वास्तव्य राक्षसां वधले कसे ।
वृत्त हे ऐकुनी राजा अतिविस्मित होतसे ॥7॥

अतिथी परमं प्राप्तौ पुत्रौ दशरथस्य तौ ।
पूजयामास विधिवत् सत्कारार्हौ महाबलौ ॥8॥

दशरथपुत्र दोन अतिथि परम लाभता ।
विधिपूर्वक आतिथ्य करती सत्कारासह ॥8॥

ततः परमसत्कारं सुमतेः प्राप्य राघवौ ।
उष्य तत्र निशामेकां जग्मतुर्मिथिलां ततः ॥9॥

आदर सत्कार भव्य सुमतीकडुनी लाभता ।
रात्र ती राहुनी तेथे निघती मिथिलेकडे ॥9॥

तां दृष्ट्वा मुनय: सर्वे जनकस्य पुरीं शुभाम् ।
साधु साध्विति शंसंतो मिथिलां समपूजयन् ॥10॥

पाहुनि मिथिला नगरी जनकाची अतिरम्य ती ।
मुनी सर्व तिला वा वा म्हणूनीया प्रशंसती ॥10॥

मिथिलोपवने तत्र आश्रमं दृश्य राघव: ।
पुराणं निर्जनं रम्यं पप्रच्छ मुनिपुङ्गवम् ॥11॥

उपवनी मिथिलेच्या त्या आश्रम एक पाहुनी ।
निर्जन रम्य विचारी मुनिंना राघव तदा ॥11॥

इदमाश्रमसंकाशं किं न्विदं मुनिवर्जितम् ।
श्रोतुमिच्छामि भगवन् कस्यायं पूर्व आश्रम ॥12॥

कसे स्थान हे वाटे आश्रम परि मुनींविना ।
ऐकु इच्छितो भगवन् कोणाचा पूर्वी हा असे ॥12॥

तत्छ्रुत्वा राघवेणोक्तं वाक्यं वाक्यविशारदः।
प्रत्युवाच महातेजा विश्वामित्रो महामुनिः ॥13॥

राघवाचा ऐकुनि प्रश्न मुनि वाक्यविशारद ।
महातेज विश्वामित्र उत्तरती तदा तया ॥13॥

हन्त ते कथयिष्यामि श्रुणु तत्त्वेन राघव: ।
यस्यैतदाश्रमपदं शप्तं कोपात्महात्मन: ॥14॥

पूर्वकाली ज्याचा आश्रम ज्यानी शाप दिला असे ।
वृतान्त यथार्थ त्यांचा सांगतो राघवा तुला ॥14॥

गौतमस्य नरश्रेष्ठ पूर्वमासीन्महात्मन: ।
आश्रमो दिव्यसंकाश: सुरैरपि सुपूजित: ॥15॥

महात्मा असती पूर्वी गौतम नरश्रेष्ठ जे ।
दिव्य आश्रम हा त्यांचा सुरही पूजिती तया ॥15॥

स चात्र तप आतिष्ठदहल्यासहित: पुरा ।
वर्षपूगान्यनेकानि राजपुत्र महायश: ॥16॥

तप करती ते येथे अहिल्येसह पत्नि जी ।
अनेक वर्षे ते चाले राजपुत्रा महायशा ॥16॥

तस्यान्तरं विदित्वा च सहस्राक्ष: शचीपति: ।
मुनिवेषधरो भूत्वा अहल्यामिदमब्रवीत॥17॥

गौतम आश्रमि नसता सहस्राक्ष शचीपति ।
मुनिवेष धारण करुनी अहल्येस वदे असा॥17॥

ऋतुकालं प्रतीक्षन्ते नार्थिन: सुसमाहिते ।
संगमं त्वहमिच्छामि त्वया सह सुमध्यमे ॥18॥

संगमोत्सुक नर जो ऋतुकाल न पाहतो ।
सुंदरी समागम मी तुजशी करु इच्छितो ॥18॥

मुनिवेषं सहस्राक्षं विज्ञाय रघुनन्दन ।
मतिं चकार दुर्मेधा देवराजकुतूहलात ॥19॥

मुनिवेषात तो इंद्र जाणुनीही दुर्बुद्धि ती
स्वीकारी आकर्षणे त्याच्या प्रस्ताव रघुनन्दना ॥19॥

अथाब्रवीत सुरश्रेष्ठं कृतार्थेनान्तरात्मना ।
कृतार्थास्मि सुरश्रेष्ठ गच्छ शीघ्रमित: प्रभो ॥20॥
आत्मानं मां च देवेश सर्वथा रक्ष गौतमात ।

समागमानंतर ती कृतार्थ होउनि वदे ।
कृतार्थ मी सुरश्रेष्ठा निघावे शीघ्र येथुनि ॥20॥
गौतम क्रोधापासूनि रक्षावे मज आपण ।

इन्द्रस्तु प्रहसन्‍ वाक्यमहल्यामिदमब्रवीत ॥21॥
सुश्रोणि परितुष्टोऽस्मि गमिष्यामि यथागतम्‍ ।

इन्द्रही हसुनी वाक्य अहल्येस असे म्हणे ॥21॥
सुश्रोणि होउनी तुष्ट जातो मी आलो तसा ।

एवं संगम्य तु तदा निश्चक्रामोटजात ततः ॥22॥
स सम्भ्रमात त्वरन्‍ राम शंकितो गौतमं प्रति ।

समागमान्ती इन्द्र कुटीबाहेर येतसे ॥22॥
येत गौतम शंकेने निघण्याची त्वरा करी ।

गौतमं स ददर्शाथ प्रविशन्तं महामुनिम्‍ ॥23॥
देवदानवदुर्धर्षं तपोबलसमन्वितम्‍ ।

तीर्थोदक परिक्लिन्नं दीप्यमानमिवानलम् ॥24॥
गृहीतसमिधं तत्र सकुशं मुनिपुङ्गवम् ।

पाही गौतमा दुर्धर्ष देवता दानवांसही ॥23॥
तपोबलसंपन्न जो प्रवेश करि आश्रमी ।
भिजलेले तीर्थजले हाती समिधा घेउन ॥24॥
अग्नीसमान उद्दीप्त दिसती प्रज्वलीत त्या ।

दृष्ट्वा सुरपतिस्त्रस्तो विषण्ण वदनोऽभवत ॥25॥
अथ दृष्ट्वा सहस्राक्षं मुनिवेषधरं मुनिः।

दुर्वृत्तं वृत्तसम्पन्नो रोषाद् वचनमब्रवीत ॥26॥

सुरपति पाहुनी त्यां भयकंपित होतसे ॥25॥
मुनिवेषात इन्द्रास पाहुनीया मुनीवर ।
ऋषिवर्य सदाचारी रोषाने म्हणती असे ॥26॥

मम रूपं समास्थाय कृतवानसि दुर्मते ।
अकर्तव्यमिदं यस्माद् विफलस्त्वं भविष्यसि ॥27॥

माझ्या रूपात येऊनी करिसी पापकर्म तू ।
होशील नपुंसक तू इंद्रिय गळुनी तुझे ॥27॥

गौतमेनैवमुक्तस्य सुरोषेण महात्मना ।
पेततुर्वृषणी भूमौ सहस्राक्षस्य तत्क्षणात ॥28॥

वदता रागाने ऐसे महात्मा गौतमे यदा ।
दोन्ही वृषण इन्द्राचे गळुनी पडति भूवरी ॥28॥

तथा शप्त्वा च वै शक्रं भार्यामपि च शप्तवान् ।
इह वर्षसहस्राणि बहूनि निवसिष्यसि ॥29॥
वातभाक्षा निराहारा तप्यन्ती भस्मशायिनी ।
अदृष्या सर्वभूतानामाश्रमेऽस्मिन् वसिष्यसि ॥30॥

इन्द्रास शाप देऊनी पत्नीसहि शाप देति ते ।
इथेच सहस्र वर्षे राहशील पिउनी हवा ॥29॥
खाता न पिता काही राखेत पडूनिया।
सर्वांपासुनि अदृष्य आश्रमी राहशील तू ॥30॥

यदा त्वेतद् वनं घोरम् रामो दशरथात्मजः ।
आगमिष्यति दुर्धर्षस्तदा पूता भविष्यसि ॥31॥
तस्यातिथ्येन दुर्वृत्ते लोभमोहविसर्जिता ।
मत्सकाशं मुदा युक्ता स्वं वपुर्धारयिष्यसि ॥32॥

जेव्हां वनात या घोर राम दशरथ पुत्र जो ।
दुर्घर्ष जो असे येता पवित्र तेव्हां होशिल ॥31॥
करता आतिथ्य त्याचे दोषातुनि मुक्त होशिल
आनंदे मजकडे येता लाभेल वपु पूर्ववत ॥32॥

एवमुक्त्वा महातेजा गौतमो दुष्टचारिणीम् ।
इममाश्रममुत्सृज्य सिद्धचारण सेविते ।
हिमवच्छिखरे रम्ये तपस्तेपे महातप: ॥33॥

दुराचारिणि पत्नीस ऐसे वदुनि गौतम ।

सोडती आश्रमा जाती सिद्धचारण यांसवे ।
हिमशिखरी तपासाठी तेजस्वी ते महातप ॥33॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डेऽष्टचत्वारिंशः सर्गः ॥48॥**

# रामायण बालकाण्ड सर्ग 49

अफलस्तु तत: शक्रो देवानग्निपुरोगमान ।
अब्रवीत त्रस्त नयन: सिद्धगंधर्वचारणम ॥1॥

अण्डाशयविरहित इंद्र देवां,अग्नि पुरोगमा
बोले त्रस्तमुद्रेने सिद्ध,गंधर्व,चारणा ॥1॥

कुर्वता तपसो विघ्नं गौतमस्य महात्मन: ।
क्रोधमुत्पाद्य हि मया सुरकार्यमिदं कृतम ॥2॥

गौतमा क्रोध आणूनी तपी विघ्न मी आणले ।
महात्म्याच्या तपोभंगे देवकार्यच जाहले ॥2॥

अफलोऽस्मि कृतस्तेन क्रोधात सा च निराकृता ।
शापमोक्षेण महता तपोऽस्यापहृतं मया ॥3॥

मज अण्डकोशरहित केले पत्नीस त्यागले ।
क्रोध आणुनि मी केले तपोभंगास त्याचिया ॥3॥

तन्मां सुरवरा सर्वे सर्षिसंगा सचारणाः।
सरकार्यकरं यूयं सफलं कर्तुमर्हसि ॥4॥

शक्रतोर्वच: श्रुत्वा देवा: साग्निपुरोगमा:।
पितृदेवानुपेत्याहु: सर्वे सह मरुद्गणै: ॥5॥

तरि ऋषींसंगे सर्व देवहो  चारणासह ।
तुम्हा साह्यकर्त्या मला वृषणयुक्त करा॥4॥
इंद्राचे ऐकुनी बोल अग्नीसह मरुद्गण ।
पितृदेवतांपाशी ते जाउनी बोलले असे ॥5॥

अयं मेष: सवृषण: शक्रो ह्यवृषण: कृत: ।
मेषस्य वृषणौ गृह्य शक्रायाशु प्रयच्छत ॥6॥

वृषण आहेत मेंढ्यास शक्रास नसती अता ।
काढुनिया मेंढ्याचे ते इन्द्रा आरोपित करा ॥6॥

अफलस्तु कृतो मेष: परां तुष्टिं प्रदास्यति ।
भवतां हर्षनार्थं च ये च दास्यन्ति मानवा: ।
अक्षयं हि फलं तेषां यूयं दास्यथ पुष्कलम् ॥7॥

वृषणरहित मेंढा हा संतोषप्रदान करी ।
त्यामुळे जो असा मेंढा करेल दान त्या नरा ।
फल प्रदान करा पूर्ण दानाचे त्यास आपण ॥॥7॥

अग्नेस्तु वचनं श्रुत्वा पितृदेवा: समागता: ।
उत्पाट्य मेषवृषणौ सहस्राक्षे न्यवेशयन् ॥8॥

अग्नीचे बोल ऐकून पितृदेवांनि येउनी ।
मेंढ्याचे वृषण काढून इन्द्रदेहात बसविले ॥8॥

तदाप्रभृति काकुत्स्थ पितृदेवा: समागता:।
अफलान् भुंजते मेषान् फलैस्तेषामयोजयन् ॥9॥
इन्द्रस्तु मेषवृषणस्तदाप्रभृति राघव ।
गौतमस्य प्रभावेण तपसा च महात्मन:॥10॥

तेव्हांपासुनि हे रामा पितृदेव स्वीकारती।
वृषणरहित मेंढ्यास दात्या पुण्य लाभते ॥9॥
गौतमतपप्रभावे ऐसे हे रघुनन्दना।
इन्द्रा वृषण मेंढ्याचे करण्या धारण लागले ॥10॥

तदागच्छ महातेज आश्रमं पुण्यकर्मण:।
तारयैमां महाभागमहल्यां देवरूपिणीम् ॥11॥

महातेजा आता जाई आश्रमी पुण्यकर्मिच्या।
देवरूपिणि उद्धारी महाभागा अहल्यास त्या ॥11॥

विश्वामित्रवच: श्रुत्वा राघव: सहलक्ष्मण:।
विश्वामित्रं पुरस्कृत्य आश्रमं प्रविवेश ह ॥12॥

विश्वामित्र वचन ऐकून लक्ष्मणासह राघव ।
जाउनी त्यांच्यामागे प्रवेश करि आश्रमी ॥12॥

ददर्श च महाभागां तपसा द्योतितप्रभाम् ।
लोकैरपि समागम्य दुर्निरीक्ष्यां सुरासुरै: ॥13॥

दैदिप्यमान तपे जी दिसे नच सुरांसुरा ।
पाही रामा अहल्येला महासौभाग्यशालिनी ॥13॥

प्रयत्नान्निर्मितां धात्रा दिव्यां मायामयीमिव ।
धूमेनाभिपरीतांगी दीप्ता अग्निशिखामिव ॥14॥
सतुषारावृतां साभ्राम्‍ पूर्णचंद्रप्रभामिव ।
मध्येऽम्भसो दुराघर्षा दीप्ता सूर्यप्रभामिव ॥15॥

निर्मिले विधात्याने दिव्य मायामयी तिला ।
धूम्रयुक्त प्रज्वलित अग्निशिखा जणु ती दिसे ॥14॥
ढग आणि तुषारांनी युक्त चंद्रप्रभेसम ।
जले उद्भासित सूर्याच्या सतेज प्रभेपरी ॥15॥

सा हि गौतमवाक्येन दुर्निरीक्षा बभूव ह ।
त्रयाणामपि लोकानां यावद् रामस्य दर्शनम् ।
शापस्यान्तमुपागम्य तेषां दर्शनमागता ॥16॥

गौतमशापाने जी तिन्ही लोकी कुणासही ।
नव्हती दिसत तिला ना जोवरी रामदर्शन ।
दर्शने शापमुक्ता ती सर्वां दिसु लागली ॥16॥

राघवौ तु तदा तस्या: पादौ जगृहतुर्मुदा ।
स्मरन्ती गौतमवच: प्रतिजग्राह सा हि तौ ॥17॥

पाद्यमर्घ्यं तथाऽऽतिथ्यं चकार सुसमाहिता ।
प्रतिजग्राह काकुत्स्थो विधिदृष्टेन कर्मणा ॥18॥

राम लक्ष्मण दोघांनी तिच्या चरणा स्पर्शिले ।
स्मरुनी गौतमवचना अगत्ये त्या दोघांसही ॥17॥
अर्पुनी पाद्य अर्घ्य त्यां अहल्या करि स्वागता ।
विधीनुसार काकुत्स्थ आतिथ्या स्वीकारि त्या ॥18॥

पुष्पवृष्टिर्महत्यासीद् देवदुन्दुभिनि:स्वनैः।
गन्धर्वाप्सरसां चैव महनासीत समुत्सव: ॥19॥

पुष्पवृष्टि महा झाली देव दुंदुभिनादही ।
गन्धर्व अप्सरा करती महान् उत्सवा तदा ॥19॥

साधु साध्विति देवास्तामहल्यां समपूजयन् ।
तपोबलविशुद्धांगी गौतमस्य वशानुगाम् ॥20॥

महर्षि गौतमाधीन विशुद्ध होता तपोबले ।
देवता सर्व वहावा करुनी प्रशंसति तिला ॥20॥

गौतमोऽपि महातेजा अहिल्यासहित: सुखी ।
रामं सम्पूज्य विधिवत् तपस्तेपे महातप: ॥21॥

गौतमहि महातेज अहिल्येसह हो सुखी ।
विधिवत पुजुनी रामा प्रारंभ तपा करी ॥21॥

रामोऽपि परमांपूजां गौतमस्य महामुने: ।
सकाशाद् विधिवत प्राप्य जगाम मिथिलां तत: ॥22॥

स्वीकारुनिया पूजा गौतमाची ती रामही ।
विधिपूर्वक केलेली निघती मिथिलेप्रती ॥22॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्ये बालकाण्डे एकोनपंचाश: सर्ग: ॥49॥**

# बालकाण्ड सर्ग 50

ततः प्रागुत्तरां गत्वा रामः सौमित्रिणा सह
विश्वामित्रं पुरस्कृत्य यज्ञवाटमुपागमत ॥1॥

ईशान्येकडे जाता श्रीराम लक्ष्मणासह
अनुसरे विश्वामित्रां यज्ञवाटेस लागतो ॥1॥

रामस्तु मुनिशार्दूलमुवाच सहलक्ष्मणः ।
साध्वी यज्ञसमृद्धिर्हि जनकस्य महात्मनः ॥2॥

राम लक्ष्मणासहित बोलतो मुनिशार्दुला ।
शोभे यज्ञसमारम्भ महनीय़ जनकाचा पहा ॥2॥

बहूनीह सहस्राणि नानादेशनिवासिनाम् ।
ब्राह्मणानां महाभाग वेदाध्ययनशालिनाम् ॥3॥

नाना देशी रहाणारे बहु सहस्र ब्राह्मण ।
जमलेत इथे सर्व वेद शास्त्रसंपन्न ते ॥3॥

ऋषिवाटाश्च दृष्यन्ते शकटी शतसंकुला: ।
देशो विधीयतां ब्रह्मन् यत्र वत्स्यामहे वयम् ॥4॥

ऋषींची वसतीस्थाने सहस्त्र शकटी इथे ।
रहावे आपण कोठे करा आपण निश्चित ॥4॥

रामस्य वचनं श्रुत्वा विश्वामित्रो महामुनि:।
निवासमकरोद् देशे विविक्ते सलिलान्विते ॥5॥

वचन ऐकुनि रामाचे विश्वामित्र महामुनी ।
पाहती स्थळ एकान्त जिथे सलिल पुष्कळ ॥5॥

विश्वामितमनुप्राप्तं श्रुत्वा नृपवरस्तदा ।
शतानन्दं पुरस्कृत्य पुरोहितमनिन्दित:॥6॥

येती विश्वामित्र तिथे वृत्त कळता नृपवरास हे ।
पुरोहित शतानन्दा श्रेष्ठा पुढति घालती ॥6॥

ऋत्विजोऽपि महात्मानस्त्वर्यमादाय सत्वरम्।
प्रत्युज्जगाम सहसा विनयेन समन्वित: ॥7॥
विश्वामित्राय धर्मेण ददौ धर्मपुरस्कृतम् ।

संगे ऋत्विजही येती अर्घ्य घेउनि सत्वर ।
विनयाने पुढे राजा होउनी स्वागतास्तव ॥7॥
विश्वामित्रां समर्पी तो अर्घ्य धर्मपुरस्कृत ।

प्रतिगृह्य तु तां पूजां जनकस्य महात्मन:॥8॥
पप्रच्छ कुशलं राज्ञो यज्ञस्य निरामयम्।

ती महात्मा जनकाची स्वीकारूनि पूजा तया ॥8॥
पुसती कुशल वृत्त राजाचे यज्ञाचेहि ते ।

स तांश्चाथ मुनीन् पृष्ट्वा सोपाध्यायपुरोधस:॥9॥
यथार्हमृषिभि: सर्वै: समागच्छत् प्रहृष्टव्रत।

पुरोहित उपाध्याय, मुनि येती नृपासह ॥9॥
पुसुनी कुशल त्यांचे हर्षे भेटति त्यांसवे।

अथ राजा मुनिश्रेष्ठं कृतांजलिरभाषत ॥10॥
आसने भगवानास्तां सहैभिर्मुनिपुंगवै:।

नमस्कारोनि मुनिश्रेष्ठा राजा वदतसे तयां ॥10॥
भगवन् मुनिवरांसंगे आपण आसनस्थ व्हा ।

जनकस्य वच: श्रुत्वा निषसाद महामुनि:॥11॥
पुरोधा: ऋत्विजश्चैव राजा च सहमन्त्रिभि:।
आसनेषु यथान्यायनुपविष्टा: समन्तत: ॥12॥

विश्वामित्र आसनस्थ ऐकुनी वचना तया ॥11॥

ऋत्विज,पुरोहित राजा आपुल्या मन्त्र्यांसवे ।
यांसवे बसती योग्य आसनी त्यांसभोवती ॥12॥

दृष्ट्वा स नृपतिस्तत्र विश्वामित्रमथाब्रवीत ।
अथ यज्ञसमृद्धिर्मे सफला देवतै: कृता ॥13॥

तयांना पाहुनी राजा बोले विश्वामित्रांप्रति ।
यज्ञ आयोजन माझे करती सफल देवता ॥1३॥

अद्य यज्ञफलं प्राप्तं भगवद्दर्शनान्मया ।
धन्योऽस्म्यनुगृहीतोऽस्मि यस्य मे मुनिपुंगव:॥14॥

यज्ञोपसदनं ब्रह्मन् प्राप्तोऽसि मुनिभि: सह ।

होई यज्ञफल प्राप्त दर्शने भगवन् आपुल्या ।
अनुग्रहे मुनिश्रेष्ठा आपुल्या धन्य आज मी ॥14॥
यज्ञमंडपी आपण महर्षींसह उपस्थित ।

द्वादशाहं तु ब्रह्मर्षे दीक्षामाहुर्मनीषिण: ॥15॥
ततो भागार्थिनो देवान् द्रष्टुमर्हसि कौशिक ।

समाप्ति यज्ञाची होता द्वादश दिनानंतर ॥15॥
पहा घेण्या हविर्भाग देव जे येति आपण ।

इत्युक्त्वा मुनिशार्दूलं प्रहृष्टवदनस्तदा ॥16॥
पुनस्तं परिपप्रच्छ प्रांजलि: प्रयतो नृप:।

वदुनी मुनिवरां ऐसे राजा आनंदित मुखे ॥16॥
पुनश्च हात जोडून विचारी नृप आणखी ।

इमौ कुमारौ भद्रं ते देवतुल्यपराक्रमौ ॥17॥
गजतुल्यगती वीरौ शार्दूलवृषभोपमौ ।
पद्मपत्रविशालाक्षौ खड्गतूणीधनुर्धरौ ।
अश्विनाविव रूपेण समुपस्थितयौवनौ ॥18॥

कुमार असती दोघे देवतुल्यपराक्रमी ॥17॥
गजतुल्य चालती वीर ते सिंहवृषभापरी ।
पद्मपत्रापरी नेत्र विशाल खड्गधारक ।
अश्विनीसम रूपाने यौवनात प्रवेशती ॥18॥

यदृच्छयेव गां प्राप्तो देवलोकादिवामरौ ।
कथं पद्भ्यामिह प्राप्तौ किमर्थं कस्य वा मुने॥19॥
वरायुधधरौ वीरौ कस्य पुत्रौ महामुने ।
भूषयन्ताविमं देशं चन्द्रसूर्याविवाम्बरम् ॥20॥

परस्परस्य सदृषौ प्रमाणेङ्गितचेष्टिते ।
काकपक्षधरौ वीरौ श्रोतुमिच्छामि तत्त्वत: ॥21॥

देवलोकातुनी येती स्वेच्छेने जणु येथ हे ।
कसे चालत येती ते उद्देशे येथ कोणत्या ॥19॥
अस्त्रधारी महावीर कोणाचे पुत्र ते मुनी।
चंद्रसूर्य नभा तैसे भूषवीती देशास या ॥20॥
एकमेकापरी दोघे शरीरे वर्तनेहि ते ।
काकपक्षधारी वीर कोण हे जाणु इच्छितो ॥21॥

तस्य तद्वचनं श्रुत्वा जनकस्य महात्मन:।
न्यवेदयदमेयात्मा पुत्रौ दशरथस्य तौ ॥22॥

महात्मा जनकाच्या ऐकुनी प्रश्नास या ।
पुत्र ते दशरथाचे सांगती विश्वामित्र त्या ॥22॥

सिद्धाश्रमनिवासं च राक्षसानां वधं तया ।
तत्रागमनव्यग्रं विशालायाश्च दर्शनम् ॥23॥
अहल्यादर्शनं चैव गौतमेन समागमम् ।
महाधनुषि जिज्ञासां कर्तुमागमनं तथा ।॥24॥

सिद्धाश्रमात निवास राक्षसांचा तसा वध ।
तेथुनी निघुनी घेत विशालपुरि दर्शन ॥23॥
अहल्या दर्शन होता गौतमाचा समागम ।
महाधनुष्य पहाण्या आमुचे हे आगमन ॥24॥

एतत सर्व महातेजा जनकाय महात्मने ।
निवेद्य विररामाथ विश्वामित्रो महामुनि:॥25॥

महातेजा जनकास महात्म्या वृत्त सर्व हे।
सांगुनी थांबती स्वस्थ विश्वामित्र महामुनी ॥25॥

# इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे पंचाशः सर्गः॥50॥

# बालकाण्ड सर्ग 51

तस्य तद् वचनं श्रुत्वा विश्वामित्रस्य धीमत:
हृष्टरोमा महातेजा: शतानन्दो महातपा: ॥1॥

वचना ऐकुनि धीमान विश्वामित्राच्या सर्व त्या ।
रोमांचित महातेज शतानन्द महातप ॥1॥

गौतमस्य सुतो ज्येष्ठस्तपसा द्योतितप्रभ:।
रामसंदर्शनादेव परं विस्मयमागत: ॥2॥

ज्येष्ठ पुत्र गौतमाचा प्रकाशित कान्तिमान ।

दर्शनेमात्र रामाच्या होतसे अतिविस्मित ॥2॥

एतौ निषण्णौ सम्प्रेक्ष्य शतानन्दो नृपात्मजौ ।
सुखासिनौ मुनिश्रेष्ठं विश्वामित्रमथाब्रवीत ॥3॥

सुखनैव बैसलेलया तयां दोघांस पाहुनी ।
मुनिश्रेष्ठा विश्वामित्रा शतानन्द विचारित ॥3॥

अपि ते मुनिशार्दूल मम माता यशस्विनी ।
दर्शिता राजपुत्राय तपोदीर्घनुपागता ॥4॥

मम माता करे दीर्घ तपस्या जी यशस्विनी ।

अपि रामे महातेजा मम माता यशस्विनी।
वन्यैरुपाहरत पूजांपूजार्हे सर्वदेहिनाम ॥5॥

अपि रामाय कथितं यद् वृत्तं तत पुरातनम।
मम मातुर्महातेजो देवेन दुरनिष्ठितम ॥6॥

श्रीरामा घडविले का तिचे दर्शन मुनिवरा ॥4॥

रामास पूज्य सर्वां जो मातेने मम यशस्विनी ।
पूजिले का फुले वन्य वापरूनी यथाविधि॥5॥

सांगितले का रामास पुरातन वृत्त ज्यामध्ये ।

दुराचार करी इन्द्र कपटे मातेसवे मम ॥6॥

अपि कौशिक भद्रंते गुरुणा मम संगता ।
मम माता मुनिश्रेष्ठ रामसंदर्शनादित:॥7॥

कल्याण कौशिका,हे सांगा रामदर्शन होउनी ।
भेटली का मम माता पित्यास मम गुरूंसही ॥7॥

अपि मे गुरुणा राम: पूजित: कुशिकात्मज:।
इहागतो महातेजा: पूजां प्राप्य महात्मन:॥8॥

पित्याने केलि का पूजा रामाची मुनि कौशिका ।

पूजा ग्रहण करूनी श्रीराम येति का इथे ॥8॥

अपि शान्तेन मनसा गुरुर्मे कुशिकात्मज ।
इहागतेन रामेण पूजितेनाभिवादित: ॥9॥

स्वीकारुनि त्यांची पूजा रामाने येथ येउनी ।
पित्या अभिवादले का शान्त चित्ते कौशिका ॥9॥

तच्छ्रुत्वा वचनं तस्य विश्वामित्रो महामुनि:।
प्रत्युवाच शतानन्दं वाक्यज्ञौ  वाक्यकोविदम् ॥10॥

ऐकुनी वचना त्याच्या विश्वामित्र महामुनी ।

वाक्पटु शतानंदास उत्तरति वाक्कोविद ॥10॥

नातिक्रान्तं मुनिश्रेष्ठ यत्कर्तव्यं कृतं मया ।
संगता मुनिना पत्नी भार्गवेणेव रेणुका ॥11॥

कर्तव्य करि मी पूर्ण उणे काही न राहिले ।
अहल्या गौतमा भेटे भार्गवा जशि रेणुका ॥11॥

तत्च्छ्रुत्वा वचनं तस्य विश्वामित्रस्य धीमतः।
शतानन्दो महातेजा रामं वचनमब्रवीत ॥12॥

बुद्धिमान विश्वामित्राच्या ऐकुनी वचनास या ।

महातेज शतानन्द रामचंद्रा असे म्हणे ॥12॥

स्वागतं ते नरश्रेष्ठ दिष्ट्या प्राप्तोऽसि राघव ।
विश्वामित्रं पुरस्कृत्य महर्षिमपराजितम् ॥13॥

सुस्वागतं नरश्रेष्ठ राघवा भाग्य केवढे ।
आलात आपण येथ महर्षि विश्वामित्रासवे ॥13॥

अचिन्त्यकर्मा तपसा ब्रह्मर्षिरमितप्रभः ।
विश्वामित्रो महातेजा वेम्त्येनं परमां गतिम् ॥14॥

अचिन्त्य कर्म तयांचे ब्रह्मर्षि प्रभावी अति ।

विश्वामित्र महातेज महती जाणतोच मी ॥14॥

नास्ति धन्यतरो राम त्वत्तोऽन्यो भुवि कश्चन ।
गोप्ता कुशिकपुत्रस्ते येन तप्तं महत्तप:॥15॥

आपणाइतका धन्य पृथ्वीवर कुणी नसे ।
रक्षिती कौशिक ज्यास तप ज्यांचे महत्तम ॥15॥

श्रूयतां चाभिदास्यामि कौशिकस्य महात्मन:।
यथाबलं यथातत्वं तन्मे निगदत: श्रुणु ॥16॥

महात्मा कौशिकाचे कैसे स्वरूप कसे बल

यथार्थ वर्णन करतो ध्यान देउनि ऐक तू ॥16॥

राजाऽऽसीदेष धर्मात्मा दीर्घकालमरिन्दमः।
धर्मज्ञः कृतविद्यश्च प्रजानां च हिते रतः॥17॥

दीर्घ काल असे राजा शत्रूंना नमवूनिया ।
विद्वान आणि धर्मज्ञ प्रजाहितदक्षही तसा ॥17॥

प्रजापतिसुतस्त्वासीत कुशो नाम महीपतिः।
कुशस्य पुत्रो बलवान कुशनाभ सुधार्मिकः॥18॥

पूर्वी प्रजापतिपुत्र नामे कुश महीपती ।

कुशास असे पुत्र कुशनाभ सुधार्मिक ॥18॥

कुशनाभसुतस्त्वासीद् गाधिरित्येव विश्रुत:।
गाधे: पुत्रो महातेजा विश्वामित्रो महानुनि:॥19॥

कुशनाभाचा विख्यात पुत्र गाधि म्हणूनिया ।
त्याचा पुत्र महातेज विश्वामित्र महामुनी ॥19॥

विश्वामित्रो महातेजा: पालयामास मेदिनीम् ।
बहवर्षसहस्राणि राजा राज्यमकारयत ॥20॥

अनेक सहस्र वर्षे नृप महातेजस्वी तो ।

पालन करुनी पृथ्वी करी राज्य धरेवर ॥20॥

कदाचित तु महातेजा: योजयित्वा वरूथिनीम् ।
अक्षौहिणीपरिवृत्त: परिचक्राम मेदिनीम् ॥21॥

महातेजस्वी राजा तो एका समयी घेउनी ।
सेना अक्षौहिणी संगे संचरे धरतीवरी ॥21॥

नगराणि च राष्ट्राणि सरितश्च महागिरीन्।
आश्रमान् क्रमशो राजा विचरन्नाजगाम ह ॥22॥
वसिष्ठास्याश्रमपदं नानापुष्पलताद्रुमम् ।

नाना मृगणाकीर्णं सिद्धचारणसेविताम् ॥23॥

अनेक नगरे राष्ट्रे सरिता आणि महागिरी।
आश्रमहि तसे राजा संचार करता दिसे ॥22॥
आश्रम वसिष्ठांचा नाना पुष्प लता द्रुम ।
संचरति अनेक प्राणी सिद्ध चारणही स्थित ॥23॥

देवदानवगन्धर्वैः किन्नरैरूपशोभितम्।
प्रशान्तहरिणाकीर्णं द्विजसंघनिवेषितम् ॥24॥
ब्रह्मर्षिगणसंकीर्णं देवर्षिगणसेवितम् ।

देव दानव गन्धर्व किन्नरे शोभित असे ॥24॥
हरणे प्रशान्त तेथे ब्राह्मण महर्षिही ।
ब्रह्मर्षि तसे देवर्षि भोगती शोभा तशी ।
तपश्चरणसंसिद्धैरग्निकल्पैर्महात्मभिः॥25॥

सततं संकुलं श्रीमद्ब्रह्मकल्पैर्महात्मभिः।
अब्भक्षैर्वायुभक्षैश्च शीर्णपर्णाशनैस्तथा ॥26॥
फलमूलाशनैर्दान्तैर्जितदोषैर्जितेन्द्रियैः।
ऋषिभिर्वालखिल्यैश्च समन्तादुपशोभितम् ॥27॥

वसिष्ठस्याश्रमपदं ब्रह्मलोकमिवापरम् ।
ददर्श जयतां श्रेष्ठो विश्वामित्रो महाबल:॥28॥

तपाने सिद्ध झालेले तेजस्वी अग्नीसमान जे ॥25॥
ब्रह्म्यासम ऋषिश्रेष्ठ सदैव वसती तिथे ॥
पाणी पिउनी काही तर काही हवेवरी ॥26॥
काही फलमुले खाती काही पर्णे शुष्कही ।
दोषां जिंकुनिया मग्न जप होमपरायण ॥27॥
वैखानस वालखिल्य महात्मे आश्रमी असे ।

ब्रह्मलोकापरी शोभे वसिष्ठ आश्रम तो ।
विश्वामित्र विजयी पाहती आश्रमास त्या ॥28॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीय्र आदिकाव्ये बालकाण्डे एकपंचाशः सर्गः ॥51॥**

# बालकाण्ड सर्ग 52

तं दृष्ट्वा परमप्रीतो विश्वामित्रो महाबल:।
प्रणतो विनयाद् वीरो वसिष्ठं जपतां वरम् ॥1॥

पाहती विश्वामित्र वसिष्ठ जप करताना ।
परमप्रीतीने चरणा स्पर्श त्यांच्या करीति ते ॥1॥

स्वागतं तव चेत्युक्तो वसिष्ठेन महात्मना ।
आसनं चास्य भगवान् वसिष्ठो व्यादिदेश ह ॥2॥

महात्मा वसिष्ठानी स्वागता करुनी तया।
प्रदान आसन करुनी ग्रहण करण्या प्रार्थिती ॥2॥

उपविष्टाय च तदा विश्वामित्राय धीमते।
यथान्यायं मुनिवर: फलमूलमुपाहरत ॥3॥

आसनावर बसलेल्या विश्वामित्रांस बुद्धिमान।
अर्पिती मुनिवर त्याना फलमूले यथाविधी ॥3॥

प्रतिगृह्य तु तां पूजां वसिष्ठाद् राजसत्तम:।
तपोऽग्निहोत्रशिष्येषु कुशलं परिपृच्छत ॥4॥

विश्वामित्रो महातेजा वनस्पतिगणे तदा ।
सर्वत्र कुशलं प्राह वसिष्ठो राजसत्तमम् ॥5॥

स्वीकारूनि वसिष्ठांची पूजा राजशिरोमणि ।
तपशिष्याग्निहोत्राचे, पुसती कुशल तया ॥4॥
तसेच इतरांचेही वसिष्ठाना विचारती ।
सर्व कुशल ऐसे वसिष्ठ सांगती तयां ॥5॥

सुखोपविष्टं राजानं विश्वामित्रं महातपा:।
पप्रच्छ जपतां श्रेष्ठो वसिष्ठो ब्रह्मण: सुत: ॥6॥

सुखपूर्वक बसलेल्या विश्वामित्रा महातप ।
वसिष्ठ ब्रह्मर्षि श्रेष्ठ विचारति असे तयां ॥6॥

कच्चित्ते कुशलं राजन् कच्चित् धर्मेण रंजयन् ।
प्रजा: पालयसे राजन् राजवृत्तेन धार्मिक: ॥7॥

कसे कुशल आपुले धर्मपूर्वक प्रजाहित ।
पाळुनी राजनीतिस होतसे का जनहित ॥7॥

कच्चिते सम्भृता भृत्या कच्चित् तिष्ठन्ति शासने ।
कच्चिते विजिता: सर्वे रिपवो रिपुसूदन ॥8॥

आपुले सेवक संतुष्ट करती का कर्म आपुले ।
समस्त शत्रूवरी प्राप्त असे का विजय आपणा ॥8॥

कच्चिद् बलेषु कोशेषु मित्रेषु च परंतप ।
कुशलं ते नरव्याघ्र पुत्रपौत्रे तथानघ ॥9॥

आपले सैन्य कसे कोश मित्रवर्ग परंतप ।
कुशल कसे असती पुत्रपौत्र तुझे नृप ॥9॥

सर्वत्र कुशलं राजा वसिष्ठं प्रत्युदाहरत ।
विश्वामित्रो महातेजा वसिष्ठं विनयान्वितम॥10॥

असे कुशल सर्वत्र वसिष्ठां देति उत्तर ।
विश्वामित्र महातेज ऐसे विनयपूर्वक ॥10॥

कृत्वा तौ सुचिरं कालं धर्मिष्ठौ ताः कथास्तदा ।
मुदा परमया युक्तौ प्रीयेतां तौ परस्परम् ॥11॥

त्यानंतर बहू काळ वार्तालाप करीति ते ।
परस्परांशी धर्मिष्ठ प्रसन्न होति त्यामुळे ॥11॥

ततो वसिष्ठो भगवान् कथान्ते रघुनन्दन ।
विश्वामित्रमिदं वाक्यमुवाच प्रहसन्निव ॥12॥

वसिष्ठ भगवान् रामा स्मितहास्य करोनिया ।
शेवटी विश्वामित्रां वाक्य ऐसे बोलती ॥12॥

आतिथ्यं कर्तुमिच्छामि बलयास्य महाबल ।
तव चैवाप्रमेयस्य यथार्हं सम्प्रतीच्छ मे ॥13॥

अतुल्य प्रभाव तुझा महाबलि यथोचित ।
तव आतिथ्य करावे इच्छा माझी अशी असे ॥13॥

सत्क्रियां हि भवानेताम् प्रतीच्छतु मया कृताम् ।
राजंस्त्वमतिथिश्रेष्ठ: पूजनीय: प्रयत्नत:॥14॥

अतिथि आपण श्रेष्ठ कर्तव्य पूजणे तुम्हा ।
आतिथ्या मम स्वीकारा माझी ही प्रार्थना असे ॥14॥

एवमुक्तो वसिष्ठेन विश्वामित्रो महामतिः।
कृतमित्यब्रवीद्राजा पूजावाक्येन मे त्वया ॥15॥

होतसे मम सत्कार वचने केवळ आपुल्या ।
महामति विश्वामित्र वसिष्ठांना असे म्हणे ॥15॥

फलमूलेन भगवन् विद्यते यत तवाश्रमे ।
पाद्येनाचमनीयेन भगवद्दर्शनेन च ॥16॥

फले पुष्पे भगवान आश्रमातिल आपुल्या।
पाद्य आचमने तैसे दर्शने पूजित असे ॥16॥

सर्वथा च महाप्राज्ञ पूजाहेण सुपूजित:।
नमस्तेऽस्तु गमिष्यामि मैत्रेणेक्षस्व चक्षुषा ॥17॥

पूजा माझी महाप्राज्ञ केलेली योग्य आपण।
तरी आता जातो मी मैत्री ऐसीच राहुदे ॥17॥

एवं ब्रुवन्तं राजानं वसिष्ठं पुनरेव हि।
न्यमन्त्रयत धर्मात्मा पुन: पुनरुदारधी:॥18॥

राजाने ऐसे म्हणता वसिष्ठ आमन्त्रति पुन्हा।
आग्रह फिरफिरुनी ते करती उदारधी ॥18॥

बाढमित्येव गाधेयो वसिष्ठं प्रत्युवाच ह।
यथाप्रियं भगवतस्तथास्तु मुनिपुङ्गव ॥19॥

“मुनिपुङ्गव हे मान्य इच्छा आपलि जी असे “।
आपणा प्रिय ते व्हावे” गाधेय म्हणती असे ॥19॥

एवमुक्तस्तथा तेन वसिष्ठो जपतां वर:।
आजुहाव तत: प्रीत: कल्माषीं धूतकल्मषाम् ॥20॥

तसे म्हणता त्यांनी वसिष्ठ धेनुस निर्मल ।
प्रसन्न होउनी चित्ती प्रेमाने बोलाविति ॥20॥

एह्येहि शबले क्षिप्रं शृणु चापि वचो मम ।
सबलस्यास्य राजर्षेः कर्तुं व्यवसितोऽस्म्यहम् ।
भोजनेन महार्हेण सत्कारं संविधत्स्व मे ॥21॥

येई शीघ्र हे शबले, ऐक या वचना मम ।
सैन्यासह या राजास भोजना देऊनिया ।
करावा मनि सत्कार साह्य तू त्यासाठि हो ॥21॥

यस्य यस्य यथाकामं षड्रसेष्वभिपूजितम् ।
तत सर्व कामधुग दिव्ये अभिवर्षं कृते मम ॥22॥

आवडे जे जसे त्याला षड्रसयुक्त भोजन ।
वर्षाव त्या पदार्थांचा कामधेनू करीसि तू ॥22॥

रसन्नानेन पानेन लेह्यचोषेण संयुतम् ।
अन्नानां निचयं सर्वं सृजस्व शबले त्वर ॥23॥

पदार्थ स्वादिष्ट चोष्य लेह्य अन्न पानही।
अन्नाचा असा साठा करी निर्माण सत्वर ॥23॥

# इत्यर्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये द्विपंचाशः सर्गः ॥52॥

# बालकाण्ड सर्ग 53

एवमुक्ता वसिष्ठेन शबला शत्रुसूदन ।
विदधे कामधुक कामान्यस्य यस्येप्सितं तथा ॥1॥

ऐसे वसिष्ठ म्हणता शबला शत्रुसूदन ।
जशी इच्छा जया तैसी निर्मी सामग्री त्यापरी ॥1॥

इक्षून् मधूंस्तथा लाजान् मैरेयांश्च वरासवान् ।
पानानि च महार्हाणि भक्ष्यांश्चोच्चावचानपि ॥2॥

उस,मध,तसे लाजा मैरेयासम आसवां ।
रस पानक यातूनी स्वादिष्ट कृति निर्मित॥2॥

उष्णाढयस्यौदनस्यात्र राशय: पर्वतोपमा:।
मृष्टान्यन्नानि सूपांश्च दधिकुल्यास्तथैव च ॥3॥

गरमागरम भाताचे पर्वताकार ढीग ते ।
मिष्टान्ने वाहती दूध,दही,तूप नद्या जणु ॥3॥

नाना स्वादुरसानां च खाण्डवानां तथैव च ।
भोजनानि सुपूर्णानि गौडानि च सहस्रश:॥4॥

नाना रस स्वादिष्ट,खाण्डव,खाद्यपदार्थ ते ।
सहस्र भोजने थाळया भरल्या चांदीच्या तिथे ॥4॥

सर्वमासीत सुसंतुष्ट हृष्टपुष्टजनायुतम् ।
विश्वामित्रबलं राम वसिष्ठेन सुतर्पितम ॥5॥

सैनिक विश्वामित्राचे सर्व संतुष्ट भोजने ।
धष्टपुष्ट असुनी तृप्त होती सर्व मनोमनी ॥5॥

विश्वामित्रो हि राजर्षिर्हृष्टपुष्टस्तदाभवत्।
सान्त:पुरवरो राजा सब्राह्मणपुरोहित:॥6॥

राजा विश्वामित्र तयासंगे ब्राह्मण नि पुरोहित।
स्त्रिया अन्त:पुरवासी  हृष्टपुष्टच सर्वही ॥6॥

सामात्यो मन्त्रिसहित: सभृत्य: पूजितस्तदा ।
युक्त: परमहर्षेण वसिष्ठमिदमब्रवीत ॥7॥

मन्त्री अमात्य अन भृत्य प्रसन्न सर्व पूजित
सर्व नंतर आनन्दे वसिष्ठां बोलती असे ॥7॥

पूजितोऽहं त्वया ब्रह्मन पूजार्हेण सुसत्कृत:।
श्रूयतामभिधास्यामि वाक्यं वाक्यविशारद ॥8॥

तुम्ही पूजनीय तरी पूजा केली मम सुसत्कृत ।
ऐका मी बोलतो माझा विचार वाक्यविशारद ॥8॥

गवां शतसहस्त्रेण दीयतां शबला मम ।
रत्नं हि भगवन्नेतद् रत्नहारी च पार्थिव:॥9॥
तस्मान्मे शबलां देहि ममैषा धर्मतो द्विज ।

गायी लक्ष तुम्हा देतो शबला द्या मज तुम्ही ।
रत्नच ती असे हक्क नृपाचाच रत्नावर ॥9॥
म्हणून शबला देई धर्मत: जी असे मम ।

एवमुक्तस्तु भगवान् वसिष्ठो मुनिपुङ्गव:॥10॥
विश्वामित्रेण धर्मात्मा प्रत्युवाच महीपतिम् ।

विश्वामित्र वदती ऐसे भगवान वसिष्ठां जंव ॥10॥
महीपतीस उत्तरती धर्मात्मा मुनिश्रेष्ठ ते ।

नाहं शतसहस्रेण नापि कोटिशतैर्गवाम् ॥11॥
राजन् दास्यामि शबलां राशिभी रजतस्य वा।
न परित्यागमयं मत्सकाशादरिंदम ॥12॥

शत सहस्र वा कोटी शत गाई दिल्यातरी ॥11॥

किंवा राजन् जरी देशी रौप्याची रास तू मला ।
शबला मजपासूनी न हो मुक्त न देइ मी ॥12॥

शाश्वती शबला मह्यं कीर्तिरात्मवतो यथा ।
अस्यां हव्यं च कव्यं च प्राणयात्रा तथैव च ॥13॥

आपल्या कीर्तिप्रमाणे शबला सर्वदा मम ।
हव्य कव्य तसा माझा प्राणनिर्वाह ती असे ॥13॥

आयत्तमग्निहोत्रं च बलिंहोमस्तथैव च ।
स्वाहाकारवषट्कारौ विद्याश्च विविधास्तथा ॥14॥

अग्निहोत्र,बली होम स्वाहा वषट्कारही ।
अनेक विद्या सर्व कामधेनु अधीन त्या ॥14॥

आयत्तमत्र राजर्षे सर्वमेतन्न संशयः।
सर्वस्वमेतत सत्येन मम तुष्टिकरी तथा ॥15॥
कारणैर्बहभी राजन् न दास्ये शबलां तव ।

सर्वस्व मम हे राजन् असे धेनु अधीन या ।
प्रकारे सर्व संतुष्ट करी ही मज सर्वदा ॥15॥
अनेक कारणे धेनू देऊ शकत ना तुला ।

वसिष्ठेनैवमुक्तस्तु विश्वामित्रोऽब्रवीत तदा ॥16॥
संरब्धतरमत्यर्थं वाक्यं वाक्यविशारद ।

वसिष्ठ म्हणता ऐसे अतिक्रोधित होउनी॥16॥

वच ऐसे विश्वामित्र वदती वाक्यविशारद ।
हैरण्यकक्षग्रैवेयान सुवर्णाङ्कशभूषितान ॥17॥

ददामि कुञ्जराणां ते सहस्राणि चतुर्दश ।
चौदाहजार गज जे सुवर्णाने मढविले ॥17॥

सुवर्णविभूषित जे आपणा देत मी असे ।

हैरण्यानां रथानां च शेताश्वानां चतुर्युजाम् ॥18॥
ददामि ते शतान्यष्टौ किंकिणीकविभूषितान् ।
हयानां देशजातानां कुलजानां महौजसाम् ।
सहस्रमेकं दश च ददामि तव सुव्रत ॥19॥
नानावर्णविभक्तानां वय:स्थानां तथैव च ।
ददाम्येकां गवां कोटिं शबला दीयतां मम ॥20॥

श्वेत अश्व ओढिती ज्या रथ सुवर्णमय असे।
आठशे असे देतो ज्या सुवर्णमय घुंगरु ॥18॥

अश्व शुभ्र रथा चार ज्यांची उपज उत्तम ।
दशसहस्र असे अश्व महातेजस्वी उत्तम ॥19॥
तश्या अनेक वर्णाच्या अवस्थांच्याहि वेगळ्या ।
गाई कोटी अश्या देतो शबला देसि तू मज ॥20॥

यावदिच्छसि रत्नानि हिरण्यं वा द्विजोत्तम ।
तावद् ददामि ते सर्वं दीयतां शबला मम ॥21॥

याहून अधिक काही रत्ने सुवर्ण द्विजोत्तमा ।
देईन ते सर्व काही देसी तू शबला मज ॥21॥

एवमुक्तस्तु भगवान्‌ विश्वामित्रेण धीमता ।
न दास्यामिति शबलां प्राह राजन्‌ कथंचन ॥22॥

एवढे बोलता राजा विश्वामित्र बुद्धिमान ।
महर्षि म्हणती त्याला शबला नच देइन ॥22॥

एतदेव हि मे रत्नमेतदेव हि मे धनम्‌ ।
एतदेवहि सर्वस्वमेतदेव हि जीवितम्‌ ॥23॥

रत्न हीच असे माझी हीच धन माझे असे ।
ही सर्वस्व असे माझे हीच माझे जीवन ॥23॥

दर्शश्च पौर्णमासश्च यज्ञाश्चैवाप्तदक्षिणा:।
एतदेव हि मे राजन् विविधश्च क्रियास्तथा ॥24॥

पौर्णमास मम दर्श दक्षिणायुक्त यज्ञही।
पुण्यकर्मेहि असे जे सर्व काही हीच रे ॥24॥

अतोमूला: क्रिया: सर्वा मम राजन् न संशय:।
बहुना किं प्रतापेन न दास्ये कामदोहिनीम् ॥25॥

मूळ सर्व शुभ कर्मांचे मम हीच नि:संशय ।
अधिक सांगणे नलगे न देई कामधेनु मी ॥25॥

# इति श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये त्रिपञ्चाशतः सर्गः।।53।।

# बालकाण्ड सर्ग 54

कामधेनुं वसिष्ठोऽपि यदा न त्यज्यते मुनिः।
तदास्य शबलां राम विश्वामित्रोऽन्वकर्षत ॥1॥

देती न कामधेनूस वसिष्ठ मुनि पाहुनी ।
विश्वामित्र तिला रामा बळे नेण्यास पाहती ॥1॥

नीयमाना तु शबला राम राज्ञा महात्मना ।
दु:खिता चिन्तयामास रुदन्ती शोककर्शिता ॥2॥

धेनु ओढिलि जाणारी रामा राजाकडूनिया ।
विचार करि दु:खाने शोकाने करि रूदन ॥2॥

परित्यक्ता वसिष्ठेन किमहं सुमहात्मना ।
याहं राजभृतैर्दीना ह्रियेय भृशदु:खिता ॥3॥

त्यागिले का वसिष्ठांनी महात्मा मज त्यामुळे ।
ओढिती सैनिक राजाचे मज दीन अतिदु:खिता ॥3॥

किं मयापकृतं तस्य महर्षे: वितात्मन:।
यन्मामनागसं दृष्ट्वा भक्तां त्यजति धार्मिक:॥4॥

पवित्रमना ऋषींचा केला अपराध काय मी ।
की निष्पाप भक्त मजला त्यागिती ते महामुनी ॥4॥

इति संचिन्तयित्वा तु निःश्वस्य च पुनःपुनः।
जगाम वेगेन तदा वसिष्ठं परमौजसम् ॥5॥
निर्धूय तांस्तदा भृत्यान् शतशः शत्रुसूदन ।

विचार करुनी ऐसा घेउनी दीर्घ श्वास ती ।
वेगाने जातसे महातेजस्वी वसिष्ठांकडे ॥5॥
राजसेवकांपासूनी वेगे सोडवुनी स्वता

जगामानिलवेगेन पादमूलं महात्मन:॥6॥
शबला सा रुदन्ती च क्रोशन्ती चेदमब्रवीत।
वसिष्ठास्याग्रत: स्थित्वा रुदन्ती मेघनि:स्वना ॥7॥

वायुवेगे येऊनि ती महात्माचरणी स्थित ॥6॥
स्वरे मेघ गम्भीर वसिष्ठापुढती रडे।
शबला रडत आक्रोश करता करता वदे ॥7॥

भगवन् किं परित्यक्ता त्वयाहं ब्रम्हण: सुत।
यस्माद् राजभटा मां हि नयन्ते त्वत्सकाशत: ॥8॥

ब्रह्मकुमारा मजला त्यागिले का ज्यामुळे ।
तुम्हापासुनिया दूर राजसेवक ओढिती ॥8॥

एवमुक्तस्तु ब्रह्मर्षिरिदं वचनमब्रवीत ।
शोकसंतप्तहृदयां स्वसारमिव दु:खितम ॥9॥

ऐसे म्हणता धेनु संतप्त हृदया जी असे।
भगिनीसम जी तिजला वसिष्ठ बोलती असे ॥9॥

न त्वां त्यजामि शबले नापि मेऽपकृतं त्वया।
एष त्वां नयते राजा बलोन्मत्त महाबल: ॥10॥

करत नसे मी त्याग काही अपराध नसे तुझा ।
उन्मत्त नेतसे राजा महाबली तुला बळे ॥10॥

नहि तुल्यं बलं मह्यं राजा त्वद्य विशेषत:।
बली राजा क्षत्रियश्च पृथिव्या: पतिरेव च ॥11॥

राजाचे बळ महान क्षत्रिय तो पृथ्वीपति।
असे राज्ञपदी आज माझे बळ न त्यासम ॥11॥

इयमक्षौहिणी पूर्णा गजवाजिरथाकुला ।
हस्तिध्वजसमाकीर्णा तेनासौ बलवत्तर:॥12॥

त्याच्याजवळी सैन्य गज अश्व रथे युत ।
फडकती ध्वज त्यावरती अतिप्रबल त्यामुळे ॥12॥

एवमुक्ता वसिष्ठेन प्रत्युवाच विनीतवत्।
वचनं वचनज्ञा सा ब्रह्मर्षिमतुलप्रभम् ॥13॥

वसिष्ठ म्हणता ऐसे मर्म जाणुनि त्यातले।
विनयाने कामधेनु म्हणे ब्रह्मर्षिना असे ॥13॥

न बलं क्षत्रियास्याहुर्ब्राह्मणा बलवत्तरा:।
ब्रह्मन् ब्रह्मबलं दिव्यं क्षात्राच्च बलवत्तरम्॥14॥

क्षत्रिय बल हे न खरे बलवत्तर ब्राह्मण ।
असे ब्रह्मबल दिव्य प्रबल क्षत्रियाहुनी ॥14॥

अप्रमेयं बलं तुभ्यं न त्वया बलवत्तरः।
विश्वामित्रो महावीर्यस्तेजस्तव दुरासदम् ॥15॥

अपरिमेय बल आपले विश्वामित्राचे नसे।
विश्वामित्र महावीर परी दुर्धर्ष आपण ॥15॥

नियुङ्क्ष्व मां महातेजस्त्वं ब्रह्मबलसम्भृताम् ।
तस्य दर्पं बलं यत्नं नाशयामि दुरात्मनः॥16॥

आपल्या ब्रह्मबलाने परिपुष्ट असेच मी ।
आज्ञा करा दुरात्म्याचे दर्प बल नाशेन मी ॥16॥

इत्युक्तस्तु तया राम वसिष्ठस्तु महायशा:।
सृजस्वेति तदोवाच बलं परबलार्दनम् ॥17॥

तिने म्हणता ऐसे वसिष्ठ महायश ।
उत्पन्न करण्या सैन्य शत्रुघ्न तिज सांगती ॥17॥

तस्य तद्वचनं श्रुत्वा सुरभि: सासृजत तदा ।
तस्या हुंभारवोत्सृष्टा: पहलवा: शतशो नृप:॥18॥

आदेश ऐकुनि त्यांचा करी तैसेच धेनु ती ।
हुंकारातुन निर्मी शतश: वीर दुर्जय ॥18॥

नाशयन्ति बलं सर्वं विश्वामित्रस्य पश्यत:।
स राजा परमकृद्ध: क्रोधविस्फारितेक्षण: ॥19॥

बघता बघता नष्ट विश्वामित्र सैन्य होतसे ।
राजा होउनि अतिक्रुद्ध विस्फारुनि पाहि नेत्र हे ॥19॥

पहलवान् नाशयामास शस्त्रैरुच्चावचैरपि ।
विश्वामित्रार्दितान् दृष्ट्वा पलवान् शतशस्तदा ॥20॥

भूय एवासृजद घोरान शकान यवनमिश्रितान ।
तैरासीत संवृता भूमि: शकैर्यवनमिश्रितै:॥21॥

विश्वामित्र करी नष्ट पहलवा अस्त्र योजुनी ।
नष्ट ते होति पाहूनी शतश: धेनु त्यावरी ॥20॥
भयंकर शक योद्धे यवनमिश्रित निर्मि ती ।
संख्या इतुकी त्यांची सारी पृथ्वी भरे तये ॥21॥

प्रभावद्भिर्महावीरे हेमकिंजल्कसंन्निभै:।
तीक्ष्णासिपट्टिशधरैर्हेमवर्णाम्बरावृतै: ॥22॥

निर्दग्धं तबलं सर्वं प्रदीप्तैरिवपावकै:।
ततोऽस्त्राणि महातेजा विश्वामित्रो मुनोच ह ।
तैस्ते यवनकाम्बोजा बर्बराश्चाकुलीकृता: ॥23॥
सुवर्ण केसर कान्ती वस्त्रांकित हिरण्मय ।
तीक्ष्ण खड्ग पट्टीश हाती करति धारण ॥22॥
सेनेस करती भस्म अग्नीपरि प्रदीप्त ते ।
त्यांवरही विश्वामित्र अनेक अस्त्रे सोडती ।
ज्यांनी यवन काम्बोज बर्बर व्याकुल होति ते ॥23॥

# इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे चतु:पञ्चाशः सर्गः ॥54॥

# बालकाण्ड सर्ग 55

तत्स्तानाकुलान् दृष्ट्वा विश्वामित्रास्त्रमोहितान् ।
वसिष्ठश्चोदयामास कामधुक् सृज योगत: ॥1॥

विश्वामित्राच्या अस्त्रांनी घायाळ पाहुनिया तयां।
वसिष्ठ कामधेनूस आज्ञापी निर्मिण्या पुन्हा ॥1॥

तस्या हुंकारतो जाता: काम्बोजा रविसंनिभा:।
ऊधसश्चाथ सम्भूता बर्बरा: शस्त्रपाणया:॥2॥

हुंकारता तिने तेव्हां काम्बोज सूर्योपम ।
स्तनांतूनी उत्पन्न शस्त्रधारी बर्बर ॥2॥

योनिदेशाश्च यवना: शकृद्देशाच्छका: स्मृता:।
रोमकूपेषु म्लेंच्छाश्च हारीता: सकिरातका:॥3॥

योनीतुनि तिच्या यवन गुदातून शक निर्मित।
रोमकूपातुनी म्लेंच्छ,हारीत किरात असे ॥3॥

तैस्तन्निषुदितं सर्वं विश्वामित्रस्य तत्क्षणात ।
सपदातिगजं साश्वं सरथं रघुनन्दन ॥4॥

त्यानी विश्वामित्राच्या गज अश्व रथ दलां।
संहारले क्षणामध्ये सैन्यासह पायदळा ॥4॥

दृष्ट्वा निषूदितं सैन्यं वसिष्ठेन महात्मना:।
विश्वामित्रसुतानां तु शतं नानाविधायुधम् ॥5॥
अभ्यधावत् सुसंकृद्धं वसिष्ठं जपतां वरम् ।
हंकारणैव तान् सर्वान् निर्ददाह महानृषि:॥6॥

पाहुनी संहार सैन्याचा होता वसिष्ठबळे ।
शत विश्वामित्रपुत्र आयुधां विविध घेउनी ॥5॥

धावती क्रुद्ध होउनी जपस्थ वसिष्ठांकडे ।
क्षणात दग्ध ते होती वसिष्ठे हुंकारता ॥6॥

ते साश्वरथपादाता वसिष्ठेन महात्मना ।
भस्मीकृता महूर्तेन विश्वामित्रसुतास्तथा ॥7॥

रथ,अश्व,पायदळा विश्वामित्रपुत्रांसवे ।
भस्मीकृत घडीमध्ये वसिष्ठ करती महान ॥7॥

दृष्ट्वा विनाशितान सर्वान बलं च सुमहायशा:।
सव्रीडं चिन्तयाविष्टो विश्वामित्रोऽभवत तदा ॥8॥

पाहुनी नाश पुत्रांचा होताना सर्व सैन्यासवे ।
लज्जित विश्वामित्र चिंतायुक्त होति ते ॥8॥

समुद्र इव निर्वेगो भग्नद्रष्ट्र इवोरग:।
उपरक्त इवादित्य:सद्यो निष्प्रभतां गत:॥9॥

दन्तभ्रष्ट जसा सर्प सागरापरि शान्तही।
राहुग्रस्त जसा सूर्य तसा निस्तेज होतसे ॥9॥

हतपुत्रबलो दीनो लूनपक्ष इव द्विज:।
हतसर्व बलोत्साहो निर्वेदं समपद्यत ॥10॥

सेना पुत्र गमावून पक्षी पंखाविना जसा ।
हतोत्साह निर्बल तो अंतरी बहु खिन्नही ॥10॥

स पुत्रमेकं राज्याय पालयेति नियुज्य च।
पृथिवीं क्षत्रधर्मेण वनमेवाभ्यपद्यत ॥11॥

उरे पुत्र जो एक नियुक्त करुनी तया ।
क्षात्रधर्मानुसारेण वनी निघुन जातसे ॥11॥

स गत्वा हिमवत्पार्वे किन्नरोरगसेवितम् ।
महादेवप्रसादार्थं तप्पस्तेपे महातपा:॥12॥

हिमालय पार्श्वे जेथे नाग किन्नर राहती ।
महादेव कृपेसाठी तप करिती महातप ॥12॥

केनचित त्वथ कालेन देवेशो वृषभध्वज:।
दर्शयामास वरदो विश्वामित्रं महामुनिम ॥13॥

कालानंतर काही देवेश वृषभध्वजे ।
दर्शन विश्वामित्रास देऊनि म्हटले तया ॥13॥

किमर्त्यं तप्यसे राजन ब्रूहि यत ते विवक्षितम ।
वरदोऽस्मि वरो यस्ते कांक्षित: सोऽभिधीयताम ॥14॥

तप कशास्तव करसी राजा हे सांग तू मला ।
वर देण्यास आलो मी सांग इच्छिसि काय ते ॥14॥

एवमुक्तस्तु देवेन विश्वामित्रो महातपाः।
प्रणिपत्य महादेवं विश्वामित्रोऽब्रवीदिदम् ॥15॥

शिवांचे वच ऐकून विश्वामित्र महातपी ।
नमस्कारुनिया त्यांना बोलती वच आपुले॥15॥

यदि तुष्टो महादेव धनुर्वेदो ममानघ ।
सांगोपांगोपनिषदः सरहस्य प्रदीयताम् ॥16॥

जर संतुष्ट महादेवा रहस्यासह द्या मज ।
उपनिषद् साङ्गोपाङ्ग धनुर्वेदच यांसवे ॥16॥

यानि देवेषु चास्त्राणि दानवेषु महर्षिषु।
गन्धर्वयक्षरक्ष:सु प्रतिभान्तु ममानघ ॥17॥
तव प्रसादाद् भवतु देवदेव ममेप्सितम् ।

देव,दानव गन्धर्वा अस्त्रे जी यक्षराक्षसां ।
असती अवगत ती ती स्फुरावी मम अंतरी॥17॥
प्रसादे आपुल्या देवा मनोरथ असे मम ।

एवमस्त्विति देवेशो वाक्यमुक्त्वा गतस्तदा ॥18॥
प्राप्य चास्त्राणि देवेशाद् विश्वामित्रो महाबल:।
दर्पण महता युक्तो दर्पपूर्णोऽ भवत तदा ॥19॥

"होवो तसे" म्हणुनिया जाती देवेश तेथुनी ॥18॥
देवेशाकडुनी प्राप्त अस्त्रे होता महाबली ।
गर्वाने फुगुनी गेला अभिमाने स्वताचिया ॥19॥

विवर्धमानो वीर्येण समुद्र इव पर्वणि।
हतं मेने तदा राम वसिष्ठमुनिसत्तमम॥20॥

पूर्णिमा सागर तैसा बलवान समजे स्वतां ।
वसिष्ठा मृत समजे तो स्वहस्ते राघवा तदा ॥20॥

ततो गत्वाऽऽश्रमपदं मुमोचास्त्राणि पार्थिव:।
यैस्तत तपोवनं नाम निर्दग्धं चास्त्रतेजसा ॥21॥

वसिष्ठाश्रमि जाऊनी अस्त्रे विविध सोडुनी ।
तपोवन सर्व दग्ध होउनी जाइ त्यामुळे ॥21॥

उदीर्यमाणमस्त्रं तद् विश्वामित्रस्य धीमत:।
दृष्ट्वा विप्रद्रुता भीता मुनय: शतशो दिश:॥22॥

भिउनी त्या अस्त्रतेजा विश्वामित्रे योजित ।
मुनि तेथिल भयभीत पळती सर्व दिशांस ते ॥22॥

वसिष्ठस्य च ये शिष्या ये च वै मृगपक्षिण:।
विद्रवन्ति भयाद् भीता नानादिग्भ्य: सहस्रश:॥23॥

शिष्य सर्व वसिष्ठांचे पशु पक्षी प्राणिही तसे ।
सहस्रावधि भयभीत पळती सर्व दिशांकडे ॥23॥

वसिष्ठस्याश्रमपदं शून्यमासीन्महात्मन:।
मुहूर्तमिव नि:शब्दमासीदीरिणसंनिभम् ॥24॥

महात्म्याचा तो शून्य सर्व आश्रम होतसे ।
क्षणात तो भरलेला निष्प्राण शान्त होतसे ॥24॥

वदतो वै वसिष्ठस्य मा भैरिति मुहुर्मुहः।
नाशयामास गाधेयं नीहारमिव भास्कर:॥25॥

वसिष्ठ तदा म्हणती वारंवार भिऊ नका ।
गाधेया करतो नष्ट सूर्य जैसा धुक्या करी ॥25॥

एवमुक्त्वा महातेजा वसिष्ठो जपतां वर:।
विश्वामित्रं तदा वाक्यं सरोषमिदमब्रवीत॥26॥

जप वसिष्ठ करती महातेजस्वी कोपित ।
विश्वामित्रास रागाने बोलती वाक्य हे असे ॥26॥

आश्रमं चिरसंवृद्धं यद् विनाशितवानसि।
दुराचारो हि यन्मूढस्तस्मात त्वं न भविष्यसि॥27॥

संवर्धित चिरकाल आश्रम नष्ट करीसि हा।
अविचारी दुराचारी भले न तव होतसे ॥27॥

इत्युक्त्वा परमक्रुद्धो दंडमुद्यम्य सत्वर:।
विधूम इव कालाग्निर्यमदण्डमिवापरम् ॥28॥

बोलुनी अतिसंतप्त घेउनी दंड सत्वर ।
काळाग्निसम उद्दीप्त दंडण्या त्या करी त्वरा ॥28॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे पञ्चपञ्चाशः सर्गः॥55**

# बालकान्ड सर्ग 56

एवमुक्तो वसिष्ठेन विश्वामित्रो महाबल:।
आग्नेयामस्त्रमुद्दिश्य तिष्ठ तिष्ठति चाब्रवीत ॥1॥

वसिष्ठे बोलता ऐसे विश्वामित्र महाबली ।
रोखुनी आग्नेयास्त्रा म्हणे त्यांस उभे रहा ॥1॥

ब्रह्मदंडं समुद्यम्य कालदंडमिवापरम्।

वसिष्ठो भगवान् क्रोधादिदं वचनमब्रवीत ॥2॥

रोखुनिया ब्रह्मदंडा कालदंडच तो जणु।
वसिष्ठ भगवान् क्रोधे याप्रकारे बोलती ॥2॥

क्षत्रबन्धो स्थितोऽस्म्येष यद् बलं तद् विदर्शय ।
नाशयाम्यद्य ते दर्प शस्त्रस्य तव गाधिज ॥3॥

क्षत्रियाधमा उभा मी दाखव बल आपुले ।
तव अस्त्रज्ञानाची घमेंड उतरवितो पहा ॥3॥

क्व च ते क्षत्रियबलं क्व च ब्रह्मबलं महत ।

पश्य ब्रह्मबलं दिव्यं मम क्षत्रियपांसन ||4||

क्षत्रियबल तव कोठे माझे ब्रह्मबल कुठे।
क्षत्रियकुलकलंका दिव्य ब्रह्मबल पहा ||4||

तस्यास्त्रं गाधिपुत्रस्य घोरमाग्नेयमुत्तमम् ।
ब्रह्मदंडेन तच्छान्तमग्नेर्वेग इवाम्भसा ||5||

भयंकर आग्नेयास्त्रा गाधिपुत्रे सोडिले ।
ब्रह्मदंड शान्तवी त्या अग्नीवर जणू जल ||5||

वारुणं चैव रौद्रं च ऐन्द्रं पाशुपतं तथा।

ऐषीकं चापि चिक्षेप कुपितो गाधिनन्दन:॥6॥

गाधिपुत्र तदा क्रुद्ध रौद्र,वारुण ऐषिक ।
ऐन्द्र,पाशुपतास्त्रांचा प्रयोग करती पहा ॥6॥

मानवं मोहनं चैव गान्धर्वं स्वापनं तथा।
जृम्भणं मादनं चैव संतापनविलापने ॥7॥
शोषणं दारणं चैव वज्रमस्त्रं सुदुर्जयम् ।
ब्रह्मपाशं कालपाशं वारुणं पाशमेव च ॥8॥
पिनाकमस्त्रं दयितं शुष्काहं अशनी तथा ।

दंडास्त्रमथ पैशाचं क्रौञ्चमस्त्रं तथैव च ॥9॥
धर्मचक्रं कालचक्रं विष्णुचक्रं तथैव च ।
वायव्यं मथनं चैव अस्त्रं हयशिरस्तथा ॥10॥
शक्तिद्वयं च चिक्षेप कङ्कालं मुसलं तथा ।
वैद्याधरं महास्त्रं च कालास्त्रमथ दारुणम् ॥11॥
त्रिशूलमस्त्रं घोरं च कापालमथ कङ्कणम् ।
एतान्यस्त्राणि चिक्षेप सर्वाणि रघुनन्दन ॥12॥

मानव,मोहन तैसे तदा गान्धर्व स्वापन ।

जृम्भण,मादन,आणि सन्तापन विलापन ॥7॥
शोषण दारण तैसे वज्रास्त्र सुदुर्जय ।
ब्रह्मपाश,कालपाश पाश वारुणही तसे ॥8॥
पिनाकास्त्र प्रिय त्यास अशनि शुष्क नि आर्द्रही ।
दंडास्त्र,पैशाचास्त्र क्रौञ्चास्त्र तैसे आणखी ॥9॥
धर्मचक्र.कालचक्र विष्णुचक्र तसेच ही ।
वायव्यास्त्र,मथनास्त्र हयशिराहि त्यासवे ॥10॥
शक्ति दोन प्रकारांच्या कङ्काल मुसळासवे ।

वैद्याधर महान अस्त्र कालास्त्र अतिभयंकर ॥11॥
त्रिशूलास्त्र महाघोर कापालास्त्र नि कङ्कण ।
सर्व अशी अस्त्रे रामा वसिष्ठांवर चालवी ॥12॥

वसिष्ठे जपतां श्रेष्ठे तदद्भुतमिवाभवत ।
तानि सर्वाणि दण्डेन ग्रसते ब्रह्मण: सुत: ॥13॥

ब्रह्मापुत्र वसिष्ठांना प्रहार तो जरि अद्भुत ।
दंडाने आपुल्या सर्व अस्त्रा नष्ट करीति ते ॥13॥

तेषु शान्तेषु ब्रह्मास्त्रं क्षिप्तवान गाधिनन्दन:।

तदस्त्रमुद्यतं दृष्ट्वा देवा: साग्निपुरोगमा:॥14॥
देवर्षयश्च सम्भ्रान्ता गन्धर्वा: समहोरगा:।
त्रैलोक्यमासीत संत्रस्तं ब्रह्मास्त्रे समुदीरिते॥15॥

विफल अस्त्रे सर्व होता ब्रह्मास्त्र सोडती ।
विश्वामित्र पाहुनी ते अग्नीसह देव देवता ॥14॥
देवर्षि,नाग,गन्धर्व संभ्रान्त दहनामुळे।
त्रैलोक्यही संत्रस्त ब्रह्मास्त्रा योजिल्यामुळे ॥15॥

तदप्यस्त्रं महाघोरं ब्राह्मं ब्राह्मण तेजसा ।

वसिष्ठो ग्रसते सर्वं ब्रह्मदण्डेन राघव ||16||

ब्रह्मतेजे महाघोर अस्त्रासहि वसिष्ठ ते।
ब्रह्मदण्डे करती शान्त तत्कालच राघवा ||16||

ब्रह्मास्त्रं ग्रसमानस्य वसिष्ठस्य महात्मनः।
मरीच्य इव निष्पेतुरग्ने माकुलार्चिषः ||18||

रोमरोमातुनि ज्वाळा अग्नि धूम्रयुक्त जसा।
देहातुनि वसिष्ठांच्या निघती किरणांसम ||18||

प्राज्वलद् ब्रह्मदंडस्य वसिष्ठस्य करोद्यतः।

विधूम इव कालाग्नेर्यमदण्ड इवापर: ॥19॥

प्रज्वलित ब्रह्मदण्ड वसिष्ठांच्या करातिल ।
कालाग्निसम यमदण्ड दुसरा जणु भासतो॥19॥

ततोऽस्तुवन् मुनिगणा वसिष्ठं जपतां वरम् ।
अमोघं ते बलं श्रेष्ठ लोका: सन्तु गतव्यथा:॥20॥

स्तुति करती वसिष्ठांची मुनीजन सर्व तेथिल।
अमोघ बल हे आपुले शक्ति आवरा आपुली ॥20॥

निगृहीतस्त्वया ब्रह्मन् विश्वामित्रो महाबल:।

अमोघं ते बलं श्रेष्ठ लोका: सन्तु गतव्यथा:॥21॥

महाबली विश्वामित्रा जिंकले महान आपण ।
अमोघ बल आपुले दूर लोकांची व्यथा ॥21॥

एवमुक्तो महातेजा: शमं चक्रे महाबल:।
विश्वामित्रो विनिकृतो विनि:श्वस्येदमब्रवीत॥23॥

ऐकुनी त्यांचे बोल शान्त होति वसिष्ठ ते।
पराजित विश्वामित्र दीर्घ श्वासे बोलती ॥23॥

धिग बलं क्षत्रियबलं ब्रह्मतेजोबलं बलं ।

एकेन ब्रह्मदण्डेन्सर्वास्त्राणि हतानि मे ॥23॥

धि:कार क्षात्रबलाचा ब्रह्मदण्डच शाश्वत ।
नमवी सर्वास्त्रांना ब्रह्मदण्डच एकटा ॥23॥

तदेतत प्रसमीक्षाहं प्रसन्नेन्द्रियमानस:।
तपो महत समास्थास्ये यद् वै ब्रह्मत्वकारणम ॥24॥


पाहुनी सर्व हे वाटे प्रसन्न शरीरे मने ।
महा तप करणे इष्ट ब्रह्मत्व प्राप्तिस्तव ॥24॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे षट्पञ्चाश: सर्ग:॥56॥**


श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची नऊ पुस्तकं.
यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा.








श्याम कुलकर्णी
तुझी माझी जोडी



हास्यरंगी रंगले
श्याम कुलकर्णी


श्याम कुलकर्णी
हसरी वारी
INSURANCE
STAMPING
VISA
IMMIGRATION

वाल्मिकीरामायण- ३





मराठी




श्याम कुलकर्णी




मराठी श्लोकानुवाद- श्री श्याम कुलकर्णी
॥ श्रीमद्भगवद्गीता ॥

लवकरच येत आहे.

श्री श्याम कुलकर्णी अनुवादित

मूळ वाल्मिकी रामायण मराठी श्लोकमय चौथा भाग